

# संसारसागरातील अनमोल मोती

## मा. गो. काटकर

BVBK-0402975

बा-वा
२९७५
३१।३।८७

# कथासरित्सागरातील अनमोल मोती

## भाग दुसरा

निवेदक

मा. गो. काटकर

म. ग्रं. सं. ठाणे, वाचनालय शाखा.
बाल वाङ्मय विभाग.
वा. क्र. २९७५ दिनांक ३१।३।८७
विषय बा. वा. क्र..........

कौस्तुभ प्रकाशन
नागपूर २२

BVBK-0402975

**प्रकाशक :**
शैलेश देशपांडे,
कौस्तुभ प्रकाशन,
२९/अ, नवनिर्माण सोसायटी,
राणा प्रतापनगर,
**नागपूर २२**

**मुद्रक :**
प्रभाकर धाक्रस
सूर्य ऑफसेट,
रामदास पेठ,
**नागपूर १०**

© **सर्वाधिकार :**
मा. गो. काटकर
सोलापूर

**नवीन आवृत्ती :**
१५ ऑगस्ट १९९३

**मूल्य :**
**वीस रुपये**

## निवेदन

*कुमार मित्रांनो!*

*पंडित सोमदेव हा विलक्षण प्रतिभाशाली कवी होता. त्याने बृहत्कथेतून कथा-सरित्सागरात घेतलेल्या साडेतीनशेहून जास्त छोट्या मोठ्या कथांची मोठी बहारदार व चित्ताकर्षक गुंफण केलेली आहे. मानवी स्वभावाची विविधता दाखविणाऱ्या या नाना प्रकारच्या निवडक कथांचे संकलन या संग्रहात केले आहे. या महान कथासागरातील मनोरंजक व उद्‌बोधक कथा तुम्हास नक्कीच आवडतील असा विश्वास वाटतो.*

**- मा. गो. काटकर**

## कथाक्रम

| | | |
|---|---|---|
| १) | दैवाची लीला | ३ |
| २) | वत्सराज उदयन | ९ |
| ३) | पराक्रमी विदूषक | २७ |
| ४) | अग्निदेवाचा प्रसाद | ४५ |

नं. ... क्र. २६७४ दिनांक 3/3/ .. वर्ग .. 

# दैवाची लीला

आपल्या भारतात वत्स नावाचा एक देश होता. अतिशय सुंदर आणि समृद्ध. त्या देशाची राजधानी कौशांबी. ते एक रमणीय व संपन्न नगर होते. पांडवांच्या वंशातील जनमेजयाचा पुत्र शतानीक त्या नगराचा राजा होता. त्याच्या प्रधानाचे नाव युगंधर असे होते. सुप्रतिक नावाचा त्याचा शूर सेनापती होता. शतानीकाच्या राणीचे नाव विष्णुमती असे होते. राजाला सर्व सुखे आणि वैभव अनुकूल होते. फक्त एका गोष्टीचे त्याला फार दुःख वाटत होते. त्याला मुलगा नव्हता.

एके दिवशी शतानीक राजा शिकार करण्याकरिता अरण्यात गेला. तिथे त्याला शांडिल्य मुनींचा आश्रम दिसला. राजाने शांडिल्यांची खूप विनवणी करून त्यांना आपल्या नगरास नेले व एक मोठा यज्ञ केला. त्याचा प्रसाद शांडिल्यांनी विष्णुमती राणीस दिला. त्यामुळे काही दिवसांनी तिला मुलगा झाला. त्याचे नाव सहस्त्रानीक असे ठेवण्यात आले. सहस्त्रानीक मोठा झाल्यावर राजाने त्याला युवराज केले. तेव्हा सहस्त्रानीक आपल्या पित्याबरोबर राज्यकारभारात भाग घेऊ लागला.

कालांतराने स्वर्गलोकात देव आणि दानव यांचे युद्ध सुरू झाले. तेव्हा इंद्राने आपल्याला मदत करण्याकरिता शतानिकास घेऊन येण्याकरिता आपल्या मातली नावाच्या सारथ्यास पृथ्वीवर पाठवले. तेव्हा शतानिकाने आपला प्रधान युगंधर व सेनापती सुप्रतीक यांच्या हाती सहस्त्रानीक व राज्यकारभार देऊन तो देव सहाय्यार्थ मातलीबरोबर स्वर्गलोकात गेला. तेथे त्याने युद्धात पुष्कळ दानवांना ठार मारले. अखेर तो स्वतःही त्या युद्धात मरण पावला. तेव्हा मातलीने त्याचा मृत देह पृथ्वीवर आणून दिल्यावर विष्णुमती राणीने त्याच्याबरोबर सहगमन केले. पुढे सहस्त्रानीक आपल्या पित्याच्या गादीवर बसला.

इकडे स्वर्गलोकात देवांचा विजय झाला. तेव्हा मोठा विजयोत्सव सुरू झाला. त्यात सहभागी होण्यासाठी इंद्राने सहस्त्रानिकास बोलावून घेतले. विजयोत्सवाची सांगता झाल्यावर सहस्त्रानिकाला निरोप देताना इंद्र त्याला म्हणाला, " सहस्त्रानिका, तुझ्या विवाहासंबंधी मी जे काही तुला सांगणार आहे ते लक्षपूर्वक ऐक. तू पूर्वजन्मीचा विधून नावाचा वसू आहेस. तुला आणि अलंबूषा नावाच्या अप्सरेला शाप मिळाल्यामुळे तुम्ही दोघांनी भूलोकी जन्म घेतला आहे. अलंबूषा अयोध्येत कृतवर्मा राजाची मृगांकवती नावाची कन्या झाली आहे. ती योग्य वेळी तुझी पत्नी होईल."

पुढे इंद्राचा निरोप घेऊन मातलीने चालविलेल्या रथातून सहस्त्रानीक आपल्या नगराकडे निघाला. वाटेत तिलोत्तमा नावाची एक अप्सरा त्याला भेटली आणि म्हणाली, "राजा, थोडा वेळ थांब. मी काय सांगते ते ऐक." पण सहस्त्रानिकाच्या मनात मृगांकवतीसंबंधीचे विचार चालू होते, म्हणून तिलोत्तमेच्या बोलण्याकडे त्याचे लक्षच नव्हते. त्यामुळे तिलोत्तमेला आपला अपमान झाला असे वाटले. ती रागाने म्हणाली, "राजा, जिच्या विचारात तू गढून गेला आहेस तिच्याशी तुझा चौदा वर्षे वियोग होईल." हा तिलोत्तमेचा शाप मातलीने ऐकला. पण तो सहस्त्रानिकाने ऐकलाही नाही.

नगरास परतल्यावर सहस्त्रानिकाने सर्व हकीकत आपल्या प्रधानादिकास सांगितली. तेव्हा सर्वांच्या सल्ल्याने सहस्त्रानिकाने मृगांकवतीला मागणी घालण्यासाठी आपला दूत अयोध्येच्या राजाकडे पाठवला. आपल्या नगरात आलेल्या दूताच्या तोंडून सर्व हकीकत ऐकून राजा कृतवर्म्याला फार आनंद जाला. त्याने ती वार्ता आपल्या कलावती राणीला सांगितली. तेव्हा ती आनंदून म्हणाली, "आपण राजा सहस्त्रानिकाला आपली मुलगी द्यावी. काल पहाटे स्वप्नात एक ब्राह्मण माझ्याकडे आला व त्याने मला हीच गोष्ट सांगितली!"

त्याप्रमाणे कृतवर्म्याने दूताला सम्मती देऊन आपली माणसे कौशांबी नगरास पाठविली. आणि सहस्त्रानिक आणि त्याच्या सर्व परिवारास अयोध्येस आणले. नंतर सहस्त्रानिकाशी मृगांकवतीचा मोठ्या थाटामाटात विवाहसमारंभ साजरा झाला. नंतर मृगांकवतीसह सहस्त्रानिक आपल्या नगराकडे परतला. पुढे काही महिन्यांनी तिला लागलेले डोहाळं पूर्ण करण्यासाठी सहस्त्रानिकाने

'तुझी काय इच्छा आहे ?' असे तिला विचारले. तेव्हा ती म्हणाली, "रक्तासारख्या लाल पाण्याने स्नान करावे असे मला वाटते !" तेव्हा राजाने लाल रंग घालून एका विहिरीचे पाणी रक्तासारखे लाल केले. त्या पाण्याने मृगांकवती स्नान करू लागली. तेव्हा तिचे सर्वांग लालीलाल झाले. त्यावेळी आकाशात भरारी मारणाऱ्या एका भल्या मोठ्या गरुडाची नजर राणीकडे गेली. त्याला वाटले पाण्यात एक मोठा मांसाचा तुकडा पडला आहे. म्हणून तो वेगाने खाली आला आणि त्याने राणीला उचलून नेले. थोड्याच वेळात तो आकाशात दिसेनासा झाला. ही हकीकत राजाला कळताच राजा धावतच तेथे आला व मोठ्यांदा शोक करू लागला.

त्या गरुडाने मृगांकवतीला कोठे नेले आहे ते कळण्यास काहीच मर्ग नव्हता. आता मृगांकवती आपल्याला कायमची अंतरली असे वाटून राजा अतिशय व्याकुळ झाला. त्याला मूर्च्छा आली. राजसेवकांनी त्याला सावध केले. तेवढ्यात इंद्राचा सारथी मातली तेथे आला. दिव्य दृष्टीने राजाची शोकाकुल परिस्थिती त्याला कळली होती. तिलोत्तमेच्या शापामुळे तसे घडले आहे असे राजाला त्याने सांगितले व त्याचे सांत्वन करून मातली निघून गेला. पण राजा दुःख करीतच राहिला. त्याला वाटले आता यापुढे जिवंत राहण्यास काय अर्थ आहे ! राजाच्या मंत्र्यांनी राजाची खूप समजूत घातली तेव्हा पुन्हा मृगांकवतीची व आपली भेट होईल या आशेने त्याने आपले दुःख आवरते घेतले.

तिकडे त्या गरुड पक्ष्याने जेव्हा आपण पकडून आणलेला मांसाचा तुकडा नसून ती एक जिवंत स्त्री आहे असे पाहिले तेव्हा त्याने तिला उदय पर्वतावर टाकून दिले. थोड्या वेळाने एवढा वेळ मूर्च्छित असलेली मृगांकवती शुद्धीवर आली. नि आपले डोळे उघडले, तेव्हा आपण एका दुर्गम पर्वतावर पडलो आहोत असे तिला आढळून आले. आता येथे आपला कोणीही रक्षणकर्ता किंवा मार्गदर्शक नाही असे पाहून ती दुःखित व भयग्रस्त झाली आणि रडू लागली. तेवढ्यात पाठीमागून आलेला एक भला मोठा अजगर मृगांकवतीस गिळू लागला. पण त्याच वेळी एक चमत्कार घडला.

साक्षात नारायणासारखा एक दयाशील दिव्य पुरुष तिथे अकस्मात प्रगट झाला. त्याने त्या भयंकर अजगरास ठार मारिले आणि राणीला निर्भय

करून तो अदृश्य झाला. पण दारुण दुःखी झालेल्या राणीला आता जगून काय करायचे असे वाटले. तिने आत्महत्त्या करण्याचा विचार केला. एका मत्त गजराजापुढे जाऊन ती धीटपणे उभी राहिली. पण गजराजा तिची दया आली. त्याने तिला मारले नाही. तेव्हा मृगांकवती आपल्या पतीस आठवून मोठ्यांदा आक्रोश करू लागली.

मृगंकवतीच्या रडण्याचा आवाज ऐकून फुले, फळे व मुळे आणण्याकरिता निघालेला एक मुनिकुमार तिच्यापाशी आला. त्याने तिचे सांत्वन केले. तिची सर्व हकीकत ऐकली. नंतर तिला घेऊन तो जमदग्नि मुनींच्या आश्रमाकडे गेला. अत्यंत तेजस्वी आणि दयापूर्ण अशा जमदग्नि मुनींच्या मुद्रेकडे मृगांकवतीचे लक्ष जाताच चटकन पुढे होऊन तिने आपले मस्तक त्यांच्या पायावर ठेवले. तेव्हा आश्रयार्थीवर प्रेम करणाऱ्या अंतर्ज्ञानी अशा त्या मुनीने दुःखाकुल झालेल्या राणीस म्हटले, "मुली, शोक करू नकोस.इथे तू पुत्रवती होशील व तुझ्या पतीची व तुझी भेट होईल. तू निश्चिंत मनाने येथे रहा." असे जमदग्नि मुनींचे शब्द ऐकून मृगांकवतीला मोठा धीर आला. समाधान वाटले. ती मुनींच्या आश्रमात राहू लागली.

योग्यवेळी मृगांकवतीने एका सुंदर पुत्ररत्नास जन्म दिला. "त्यावेळी हा बुद्धिवान बालक 'राजपुत्र उदयन' या नावाने कीर्तिवंत, यशवंत व सर्वविद्यापारंगत असा सार्वभौम राजा होईल." अशी आकाशवाणी झाली. उदयन सद्‌गुणांसह दिवसेंदिवस वाढू लागला. जमदग्नि मुनीने त्यास सर्व विद्या शिकवल्या. उदयन मृगांकवतीचाच नव्हे तर तेथील सर्वांचाच जीव की प्राण होऊन राहिला. मृगांकवतीला आपल्या पतीपासून प्रेमचिन्ह म्हणून एक सुवर्णकंकण मिळालेले होते. त्याच्यावर राजा सहस्त्रनिकाचे नाव होते. ते कंकण तिने आपल्या हातातून काढून उदयनाच्या हातात घातले.

एकदा अरण्यात शिकार करीत भटकत असता एका भिल्लाने एका सुंदर सापास धरले आहे असे उदयनास दिसले. तेव्हा त्या सापाची दया येऊन उदयन त्या भिल्लाला म्हणाला, "अरे बाबा, हा साप सुंदर आहे. त्याला सोडून दे." "महाराज" तो भिल्ल म्हणाला, "मी फार गरीब आहे, मी या सापास पकडून मारणार नाही. सापास खेळवून मी माझी उपजीविका करतो. यापूर्वी

माझ्याजवळ असाच एक साप होता. पण तो नुकताच मेल्यामुळे बराच वेळ शोध केल्यावर हा दुसरा साप मी पकडलाय. तेव्हा त्याला सोडून मी काय करू ?" असे त्या भिल्लाचे योग्य शब्द ऐकून उदयनाला त्याची फार दया आली. त्याने आपल्या मातेने दिलेले सुवर्णकंकण त्या भिल्लास देऊन टाकले आणि त्या सुंदर सापाची मुक्तता केली.

ते अमूल्य कंकण हाती पडताच भिल्ल तेथून निघून गेला. नंतर खूष झालेला तो साप उदयनाला नमस्कार करून म्हणाला, "राजपुत्रा, मी वासुकी नागराजाचा वडील भाऊ. माझं नाव वसुनेमी. तू माझा प्राणदाता झाला आहेस. भेट म्हणून मी ही वीणा तुला देतो. या वीणेचे नाव घोषवती आहे. हिच्या तारा अत्यंत मधुर आवाज करतात. त्याचप्रमाणे लवकर न सुकणारी माळ तुला देतो. आणि लवकर न पुसला जाणारा तिलक तयार करण्याची युक्ती मी तुला सांगतो. "असे म्हणून वसुनेमीने त्या तिन्ही वस्तू उदयनास सप्रेम भेट म्हणून दिल्या. नंतर उदयनाला उचलून घेऊन त्याने त्याला आश्रमाजवळ आणून सोडले आणि तो निघून गेला.

इकडे तो भिल्ल उदयनाने दिलेले सुवर्णकंकण घेऊन नगरास गेला. त्याने सरळ बाजारपेठ गाठली. तेथे त्याने तेथील मोठमोठ्या व्यापाऱ्यांना ते कंकण विकण्याचा प्रयत्न केला. पण त्या कंकणावर राजाचे नाव कोरलेले असल्यामुळे कोणीही व्यापारी ते विकत घेईना. अखेर राजसेवकांनी त्या भिल्लाला पकडले, आणि राजाकडे नेले. ते सुवर्णकंकण पाहताच सहस्त्रानिकाने ते ओळखले. व मृगांकवतीची आठवण होऊन त्याच्या डोळ्यातून आसवे वाहू लागली. त्याने भिल्लास विचारले, "खरं सांग, तुला हे सुवर्णकंकण कुठं मिळालं ?" तेव्हा त्या भिल्लाने राजास सर्व हकीकत सांगितली.

'माझ्या पत्नीच्या हाती असलेले कंकण या भिल्लाला कसे मिळाले असेल ? त्याने सांगितलेली हकीकत खरी असेल काय ?' असे राजाच्या मनात विचार आले तोच आकाशवाणी झाली, "राजा, तुझ्या शापाची समाप्ती झालेली आहे. तुझी प्रिय पत्नी मृगांकवती आपल्या पुत्रासह उदय पर्वतावर जमदग्नि मुनींच्या आश्रमात सुखाने राहात आहे" अशी आकाशवाणी ऐकून राजाला फार आनंद झाला.

दुसऱ्या दिवशी सकाळी आपल्याबरोबर मोठे सैन्य घेऊन सहस्त्रानीक उदय पर्वताकडे जाण्यास निघाला. त्याने त्या भिल्लालाही आपल्याबरोबर घेतले होते. प्रवास करीत करीत अखेर सहस्त्रानिक राजा आपल्या परिवारासह जमदग्नि मुनींच्या आश्रमापाशी येऊन पोहोचला. त्याने मुनींना साष्टांग नमस्कार केला. नंतर मृगांकवती उदयनासह राजाला भेटली. चौदा वर्षांच्या दीर्घ विरहानंतर त्यांची भेट होताच आनंदाश्रूंनी त्यांच्या डोळ्यात गदी केली. नंतर दोन दिवस आश्रमात राहून आणि जमदग्नि मुनींचा आशीर्वाद घेऊन सहस्त्रानिका राजा मृगांकवती व उदयनासह आपल्या कौशांबी नगरीस परत आला. तेव्हा गुढ्या उभारून आणि तोरणे लावून नागरिकांनी अत्यंत हर्षभराने सर्वांचे स्वागत केले.

# वत्सराज उदयन

वत्स देशाचा राजा सहस्त्रानीक आपल्या वृद्ध मंत्र्यासह हिमालयात तपश्चर्येसाठी निघून गेल्यावर युवराज उदयन राजा झाला. कौशांबी नगरात राहून तो आपल्या प्रजाजनांचे उत्तम रीतीने पालन करू लागला. सहस्त्रानिकाच्या मंत्र्यांचे मुलगे यौगंधरायण, रुमण्वान व वसंतक हे उदयनाच्या वयाचेच होते. ते आता उदयनाचे मंत्री झाले. यौगंधरायण उदयनाचा मुख्य प्रधान झाला. पुढे काही दिवसांनी उदयनाने आपल्या मंत्र्यांवर राज्याची सर्व जबाबदारी सोपवली व हळूहळू तो ऐहिक सुखात दंग झाला. शिकार व घोषपती वीणेचे वादन या आपल्या दोन आवडत्या छंदातच तो गुंतून राहू लागला.

उदयनाला मद्याचीही गोडी लागली. घोषवती वीणेच्या मंजुळ व मधुर आवाजाने तो रानातील माजलेल्या हत्तींना सहजतेने पकडीत असे. राज्यकारभाराकडे लक्ष देण्यास उदयनास सवड नव्हती. पण त्याचा प्रधान यौगंधरायण व सेनापती रुमण्वान हे दोघे मोठ्या दक्षतेने राज्यशकट हाकीत होते. चंडमहासेन राजाची मुलगी वासवदत्ता आपणास कशी प्राप्त होईल एवढी एकच चिंता उदयनास होती. कारण चंडमहासेनाच्या घराण्याचे व त्याच्या घराण्याचे पूर्वीपासूनचे शत्रुत्व होते.

वासवदत्ता उपवर झाली. आता तिचा विवाह करावा असे चंडमहासेनास वाटू लागले. वासवदत्तेला फक्त एक उदयनच योग्य वर आहे असे त्याला निश्चिंतपणे वाटत होते. पण घराण्या-घराण्यामधील शत्रुत्वामुळे स्वाभिमानी उदयन आपल्या मुलीला मागणी घालील असे त्याला वाटेना. 'कोणत्या ना कोणत्यातरी उपायाने त्याला आपला जावई करून घेतला पाहिजे. उदयन शिकारीचा फार नादी आहे. हत्तींना पकडण्यासाठी तो पुष्कळ वेळा अरण्यात एकटाच भटकत असतो. त्याच वेळी त्याला पकडून येथे आणावे. नंतर मोठ्या युक्तीने गायनाच्या निमित्ताने वासवदत्तेची व त्याची गाठ घालून द्यावी. म्हणजे आपल इच्छित कार्य तडीला जाईल.'

अशा विचाराने चंडमहासेनाने उदयनाला पकडण्यासाठी एक युक्ती योजिली. त्याने लाकडाचा एक प्रचंड यांत्रिक हत्ती तयार करविला. त्या हत्तीच्या पोटात आपले सशस्त्र हजार सैनिक बसविले. असा तो हत्ती नंतर त्याने विंध्यारण्यात आणून तेथे सोडून देण्याची व्यवस्था केली. हत्तीच्या तपासावर आलेले उदयनाचे हेर तेथे हातेच. त्यांनी त्या प्रचंड व भयंकर हत्तीला पाहताच उदयनाकडे धाव घेतली. ते त्याला म्हणाले, "महाराज, चला, चला, लवकर. विंध्य पर्वतासारखाच एक मोठा प्रचंड हत्ती विंध्यारण्यात आला आहे." असे हेराने सांगितलेले वृत्त ऐकून उदयनाला फार आनंद झाला. त्याने त्या हेरांना खूप द्रव्य दिले.

राजा उदयनाला वाटले, चंडमहासेनाच्या नडागिरी हत्तीसारखा तो भला मोठा हत्ती आपण धरला तर वासवदत्तेला प्राप्त करून घेण्याचे आपले काम फार सोपे होईल. त्याने लगेच शिकारीची तयारी केली. आपल्या मंत्र्यांचा व ज्योतिष्यांचा आग्रहाचा सल्ला न मानता उदयन दुसऱ्या दिवशी सकाळी बरोबर काही सैन्य घेऊन विंध्यारण्यात गेला. सैन्याला पाहून कदाचित हत्ती पळून जाईल असे वाटून राजा आपली आवडती वीणा व एक हेर यांच्यासह अरण्यात शिरला.

अरण्यात बरीच वाटचाल केल्यावर तो प्रचंड मायावी हत्ती राजाच्या नजरेस पडला. मग राजा घोषवती वीणेच्या मधुर साथीवर अत्यंत सुस्वर गात, गात हत्तीकडे जाऊ लागला. तो वीणावादनात एवढा दंग झाला होता की, समोर दिसणारा हत्ती खरा की खोटा हेही त्याला कळले नाही. तो यांत्रिक हत्ती आपले कान हालवीत, राजा आपल्याकडे येतो आहे असे पाहून पुढे पुढे जाऊ लागला. त्याने राजाला बरेच दूर नेले. एका निर्जन जागी येताच त्या हत्तीच्या पोटातून सहस्त्र सशस्त्र वीर बाहेर पडले, आणि त्यांनी उदयनाला चहु बाजूंनी घेरले.

तेव्हा आपल्या मंत्र्यांचा योग्य सल्ला न ऐकल्यामुळे आपल्यावर हे संकट ओढवले, असे स्वतःशी म्हणत उदयन आपली तलवार उपसून समोर असलेल्या वीरांबरोबर मोठ्या आवेशाने लढू लागला. पण पाठीमागच्या काही वीरांनी मागून जाऊन राजाला पकडले. त्या सर्वांनी मिळून उदयनाला जवळच येऊन राहिलेल्या आपल्या चंडमहासेन राजापुढे आणून उभे केले. तेव्हा चंडमहासेनाला खूप आनंद झाला. त्याने उदयनाची समजूत घातली व त्याच्यासह चंडमहासेन आपल्या उज्जयिनी नगराकडे निघाला.



चंडमहासेन आपल्याला मोठ्या प्रेमाने आणि सन्मानाने वागवत आहे, याचे उदयनाला आश्चर्य वाटले. नगरात पोहोचल्यावर आपल्या राजवाड्यातील एका खास महालात चंडमहासेनाने राजा उदयनाला साजेशी सर्व व्यवस्था केली. त्याने वासवदत्तेची त्याच्याशी ओळख करून दिली. त्या पहिल्या भेटीतच तिने उदयनाला आपल्या सौंदर्यादि गुणांनी मंत्रमुग्ध करून टाकले. उदयनही तिच्या सौंदयाने मोहून गेला. दोघांच्याही मनात एकमेकांविषयी प्रेमभाव निर्माण झाला आहे हे चाणाक्ष चंडमहासेनाने जाणले. त्याने उदयनाला वासवदत्तेला वीणावादन शिकवण्याची विनंती केली. उदयनाने ती तत्काळ मान्य केली.

नंतर वत्सराज उदयन चंडमहासेनाच्या गांधर्व शाळेत वासवदत्तेला वीणावादनाचे धडे देत आनंदाने राहू लागला. त्याची शिष्या वासवदत्ता आपल्या गुरूला कसलीही उणीव भासू न देता, त्याच्या आवडीनिवडीकडे खास लक्ष पुरवून त्याची सेवा करू लागली. चंडमहासेनाच्या बंदी उदयनाला वासवदत्तेने आपल्या प्रेमपाशाने बद्ध करून टाकले.

कौशांबी नगरात वत्सराज चंडमहासेन राजाचा बंदी झाल्याची वार्ता कळताच मोठी खळबळ उडाली. खवळलेल्या नागरिकानी व वीरांनी उज्जयिनीवर स्वारी करून आपल्या आवडत्या राजाला मुक्त करून आणण्याचा निश्चय केला. पण तसे करणे सोपे नाही, याची खात्री असल्यामुळे यौगंधरायणाने मोठ्या प्रयासाने लोकांची समजूत घातली. तो म्हणाला, "या प्रसंगी शक्तिपेक्षा युक्तीचाच मार्ग अनुसरून आपल्या राजाची मुक्तता केली पाहिजे." नंतर यौगंधरायणानं रुमण्वानाकडे राज्याची जबाबदारी सोपविली आणि तो वसंतकासह उज्जयिनीस जाण्यास निघाला.

पहिल्यांदा यौगंधरायण विंध्यारण्यात गेला. तेथे उदयनाचा मित्र पुलिंदक नावचा एक भिल्ल राजा होता. त्याला तो भेटला. उदयनाची मुक्तता होऊन तो आल्यावर त्याचे रक्षणास सैन्यासह सज्ज राहण्याची विनंती यौगंधरायणाने त्या भिल्ल राजाला केली. नंतर तो महामंत्री, वसंतकासह उज्जयिनी जवळच्या महाकाल नावाच्या स्मशानात गेला. ती रात्रीची वेळ होती. तेथे भुतांचा व पिशाच्चांचा फार मोठा मेळावा त्याला दिसला. तेव्हा वसंतक भीतीने थरथर कापू लागला. पण महामंत्री धीटपणे पुढे जाऊ लागला. तिथे योगेश्वर नावाचा एक ब्रह्मराक्षस यौगंधरायणाचा मित्र बनला. त्याच्या मदतीने यौगंधरायण व वसंतक यांनी आपले रूप बदलून घेतले. यौगंधरायण स्वतः कुरूप, वृद्ध, डोक्याला टक्कल पडलेला; असा एक ब्राह्मण बनला. आणि वसंतकाचे तोंड वेडेवाकडे, मोठे पोट, दात बाहेर आलेले, असा अवतार झाला. अशा तऱ्हेने आपल समग्र रूप बदलून ते नगरात शिरले. व नगरातील लहानमोठ्यांचे मनोरंजन करीत थेट राजवाड्याजवळ गेले.

त्या सोंगाड्यांना पाहाण्यासाठी राजवाड्यातील दासदासींनी गर्दी केली. ती वार्ता वासवदत्तेच्या कानी गेली. तिने दासीकरवी सोंगाड्यांना गांधर्व शाळेत आणण्याची व्यवस्था केली, तेव्हा यौगंधरायणाने वसंतकाला राजद्वारी लोकांच्या करमणुकीसाठी थांबण्यास सांगून तो स्वतः गंधर्व शाळेत गेला. तिथे आपल्या राजाला पाहून, त्याच्या डोळ्यांतून आसवे वाहू लागली. पण ती कष्टाने आवरून त्याने वत्सराजास खूण केली. त्याबरोबर हा आपला मुख्यमंत्री यौगंधरायण असल्याचे राजाने ओळखले.

नंतर उदयनाने सरस्वती पूजेच्या निमित्ताने वासवदत्तेला तिच्या दासीसह बाहेर पाठवले. नंतर ते दोघे निवांतपणे भेटले.. यौगंधरायणापाशी

योगसामर्थ्य होते. त्या सामर्थ्याच्या जोरावर काही अद्भुत गोष्टींची सिद्धी त्याने प्राप्त करून घेतली होती. त्याने राजाला बेड्या तोडण्याचा उपाय सांगितला. तसेच वीणेच्या ताराही अन्य वशीकरणाने त्याने मंत्रित केल्या. नंतर तो राजाला म्हणाला, "महाराज, माझ्याबरोबर आलेला वसंतक राजद्वाराशी उभा आहे. त्याला आपण बोलावून घ्या. तुमच्यावर वासवदत्ता पूर्ण विश्वास ठेवील असा तो प्रयत्न करील. त्यावेळी मी सांगेन तसे करा. तोपर्यंत आपण येथेच राहावं." असे म्हणून यौगंधरायण अदृश्य झाला.

सरस्वतीच्या पूजेचे साहित्य घेऊन वासवदत्ता आल्यावर राजा तिला म्हणाला, "प्रिये, राजद्वारात कोणीतरी एक ब्राह्मण उभा राहिलेला दिसतो. त्याला सरस्वतीपूजनाची दक्षिणा घेण्याकरिता बोलावून घे." असे राजाचे शब्द ऐकून वासवदत्तेने ताबडतोब आपल्या एका दासीला पाठवून वसंतकाला बोलावून घेतले. आत येताच आपला राजा एखाद्या कैद्यासारखा बद्ध झालेला पाहून वसंतकाला रडू कोसळले. पण आपले रहस्य कोणासही कळू नये म्हणून समयसूचक उदयन त्याला म्हणाला, "अरे, एखाद्या रोगामुळे तुला आलेली ही कुरूपता मी औषधाने बरी करीन. तू रडू नकोस. काही दिवस येथेच माझ्याजवळ राहा." "आपली कृपा, महाराज" वसंतक आनंदाने म्हणाला.

वसंतकाची विलक्षण वेषांतरित कुरूपता पाहून राजालाही खूप हसू आले. त्याचे कारण जाणून वसंतक देखील हसू लागला. आणि त्याच्या सोंगाला वासवदत्ताही हसू लागली. वसंतकाने आपल्या मजेदार हावभावांनी वासवदत्तेसह तिच्या दासींचे भरपूर मनोरंजन केले. वासवदत्ता वसंतकाला नेहमी नाना प्रकारच्या कथा सांगण्याची आज्ञा देत असे, तेव्हा वसंतक देखील तिला आपल्या प्रियकराच्या प्रेमासाठी आईवडिलांचे प्रेमबंधन तोडून टाकणाऱ्या स्त्रियांच्या कथा सांगे. अशा प्रकारे त्याने वासवदत्तेचे आपल्या राजावरचे प्रेम दृढ करण्याचा प्रयत्न चालू ठेवला.

आपल्या प्रियकराला आपल्या वडिलांनी बंदिवान करून ठेवले ही गोष्ट आता वासवदत्तेला आवडेना. तिला आपल्या वडिलांचा राग आला. अशा समयी यौगंधरायण कोणालाही न दिसता प्रगट झाला व राजाला म्हणाला, "महाराज, चंडमहासेन आपल्याला वासवदत्ता देऊन व आपला सत्कार करून आपली सुटका करणार असे दिसते. त्यात आमचा काही पराक्रम नसून

चंडमहासेनाची ती कृपाच असे त्याला स्वरूप येणार. तेव्हा मला असं वाटतं आपण आपल्या बुद्धिसामर्थ्याने वासवदत्तेसह येथून निघून जाऊ या. म्हणजे चंडमहासेनाला त्याच्या अयोग्य कृतीबद्दल चांगला धडा शिकवल्यासारखे होईल.'' एवढे बोलून यौगंधरायण काही क्षण थांबला. नंतर तो पुढे म्हणाला, ''महाराज, वासवदत्तेची भद्रावती नावाची एक हत्तीण आहे. तिच्याबरोबर नडागिरी हत्तीशिवाय दुसरा कोणताही हत्ती अतिशय वेगाने चालू शकत नाही. नडागिरी भद्रावतीवर हल्ला करणार नाही. अशा त्या हत्तीणीवर बसून आपण, वासवदत्ता व वसंतक यांच्यासह गुप्तपणे उज्जयिनी नगरातून बाहेर पडल्यावर विंध्यारण्यातील पुलिंदकाकडे जावे. आपल्या आधीच मी आता तिकडे जातो.'' असे सांगून यौगंधरायण निघून गेला.

नंतर उदयनाने वासवदत्तेला विश्वासात घेऊन तिला आपला बेत सांगितला. तिने सम्मती दिली. तिने आपल्या हत्तीणीच्या माहुतास योग्यवेळी तयार राहण्यास सांगितले. मग उदयनाने यौगंधरायणाने सांगितलेल्या मंत्राने आपल्या पायातील शृंखला तोडल्या आणि तो सशस्त्र झाला. त्याने घोषवती वीणा बरोबर घेतली. नंतर उदयनाबरोबर वासवदत्ता, तिची दासी कांचनमाला व वसंतक यांना घेऊन रात्री भद्रावती हत्तीण उज्जयिनी नगराबाहेर पडली. नगराबाहेर पडत असता दोन नगररक्षकांनी त्यांना अडविले. तेव्हा उदयनाने त्यांना ठार मारून आपला मार्ग मोकळा केला. नंतर ती दिव्य हत्तीण भद्रावती अतिशय वेगाने पुढे चालू लागली.

नगराच्या रक्षकांना कोणीतरी ठार मारल्याची वार्ता राजाला कळताच त्याने चौकशी केली. तेव्हा भद्रावती हत्तीण ठिकाणावर नसल्याचे त्याला कळले. मग त्याच्या आज्ञेने काही सेवक वासवदत्तेच्या महालाकडे गेले. ती तरी तिथे कुठे होती ? मग उदयन कोठे आहे, याची चौकशी सुरू झाली. तेव्हा काय घडले ते स्पष्ट झाले. उदयनाने वासवदत्तेचे हरण केले अशी राजाची खात्री झाली. प्रथम त्याला उदयनाचा राग आला. पण थोड्या वेळाने मानी उदयनाच्या कृतीबद्दल चंडमहासेनाला आनंदच वाटला.

नगरात चाललेल्या गोंधळाचे कारण ऐकून चंडमहासेनाचा मुलगा पालक नडागिरी हत्तीवर आरूढ होऊन त्वरेने उदयनाचा पाठलाग करू लागला. नडागिरीने काही वेळातच भद्रावतीला गाठले. पण उदयनाने पालकाशी युद्ध

करीत त्याला थोपवून धरले. पालकाने नडागिरीला भद्रावतीवर हल्ला करण्यास सांगितले. पण तिच्यापुढे त्याने माघार घेतली. तेवढ्यात आपल्या इच्छित कार्यात अडथळा नको म्हणून चंडमहासेनाने गोपालक नावाच्या आपल्या थोरल्या मुलाला त्वरेने पाठवून पालकाला परत बोलावून नेले. आता वत्सराज उदयन निर्भयपणे पुढे निघाला.

अरण्यातून असा प्रवास करीत असता रात्र संपली. आणि सकाळ झाली. भद्रावती दुसऱ्या दिवशी दुपार होईतो एकसारखी चालत होती. त्रेसष्ट योजने मार्गक्रमण करून विंध्यारण्यात आलेल्या तिला फार तहान लागली होती. तेव्हा राजा सर्वांसह खाली उतरला. नंतर माहुताने त्या हत्तिणीला जवळ असणाऱ्या एका तलावाकडे नेले. पण त्यातील पाणी पिताच ती लगेच गतप्राण झाली. तेव्हा सर्वांनाच, विशेषतः वासवदत्तेला अतिशय दुःख झाले. त्यावेळी एकाएकी आकाशवाणी झाली. - "राजन्, एवढे दिवस भद्रावतीच्या रूपाने असणारी मी मायावती नावाची एक विद्याधरी आहे. शापामुळे मी हत्तीण झाले होते. हे राजा, आज मी तुझ्यावर उपकार केला आहे, पुढे तुझ्या मुलावरही मी असाच उपकार करीन. ही तुझी भावी पत्नी वासवदत्ता सामान्य स्त्री नसून देवसुंदरी आहे. तिनेही शापामुळे भूलोकावर जन्म घेतलाय." अशी आकाशवाणी ऐकून उदयनाने वासवदत्तेचे सांत्वन केले. आणि आपल्या आगमनाचे वृत्त पुलिंदकाला कळविण्यासाठी वसंतकाला तिकडे पाठवले.

आता उदयन वासवदत्तेसह पायी प्रवास करीत पुढे निघाला. काही अंतरावर अरण्यात दडून बसलेल्या चोरांनी उदयनावर हल्ला केला. तेव्हा त्या शूर राजाने अल्पावधीतच एकशे पाच चोरांना ठार केले. वासवदत्ता आपल्या पतीचा पराक्रम मोठ्या कौतुकाने पहात होती. तेवढ्यात पुलिंदक यौगंधरायण व वसंतक यांच्यासह तेथे आला. त्याने बाकीच्या सर्व चोरांना पिटाळून लावले. आणि राजाला प्रणाम करून त्याला आपल्या वस्तीकडे नेले.

दुसऱ्या दिवशी सेनापती रुमण्वान ससैन्य तेथे आला. उज्जयिनीकडील काही हकीकत कळते की काय ते पाहण्याकरिता राजाने आपला तेथील मुक्काम वाढविला. ही राजाची इच्छा लवकरच सफल झाली. चंडमहासेनाचा राग दूर झाला, हे वृत्त राजाला प्रथम एका व्यापाऱ्याने सांगितले. त्याच्यामागोमाग चंडमहासेनाचा एक खास दूत राजाकडे आला. व तो राजाला

म्हणाला, "महाराज, आमचे महाराज आपल्यावर फार संतुष्ट झाले आहेत. आपण आता यापुढे वासवदत्ताताईसाहेबाशी आपला विवाह विधीपूर्वक करून देण्यासाठी युवराज गोपालक लवकरच आपणास भेटतील!"

पुढे राजा उदयन आपल्या सर्व परिवारासह लवकरच आपल्या नगरास गेला. काही दिवसांनी युवराज गोपालक पुलिंदकासह कौशांबी नगरात आला तेव्हा उदयनाने त्याचे भव्य स्वागत केले. अश्रुपूर्ण नेत्रांनी बहीण भावाला भेटली. थोड्याच दिवसात गोपालकाने विवाहसमारंभाची तयारी केली. एका शुभ मुहुर्तावर वत्सराज उदयनाने वासवदत्तेचे विधीपूर्वक पाणिग्रहण केले. त्यावेळी वर दक्षिणा म्हणून गोपालकाने वत्सराजाला रत्नांचा नजराणा दिला. विवाहसमारंभ मोठ्या थाटामाटात साजरा झाला.

नंतर वत्सराज उदयन मोठ्या आनंदात कालक्रमणा करू लागला. वासवदत्ताही मोठ्या निष्ठेने त्याची सेवा करू लागली. उदयन स्वभावाने चंचल होता. अत्यंत सुंदर अशी वासवदत्ता पत्नी म्हणून लाभली असताना देखील तो अंत:पुरातील विरचिता नावाच्या एका दासीबरोबर विशेष सलगीने वागू लागला. एकदा तर त्याने मद्याच्या धुंदीत वासवदत्तेलाच 'विरचिते' म्हणून हाक मारली. तेव्हा ती मानी वासवदत्ता अतिशय संतपाली. मग राजाने तिच्या पाया पडून तिची क्षमा मागितली; व पुन्हा तसे न वागण्याचे तिला वचन दिले.

स्वभावाला औषध नसते. वासवदत्तेच्या थोरल्या भावाने म्हणजे गोपालकाने आपल्या बाहुबलाने मिळवलेली बंधुमती नावाची एक सुंदर राजकन्या आपल्या बहिणीच्या दिमतीसाठी पाठविली. वासवदत्तेने मंजुळिका असे तिचे नाव ठेवले. ती अतिशय सुंदर राजकन्या राजाच्या दृष्टीस पडू नये म्हणून तिने खूप काळजी घेतली. पण एकदा दैवयोगाने वसंतकाबरोबर फिरत असलेल्या राजाने मंजुळिकेला एका लताकुंजात पाहिले. तेव्हा राजाचे मन तिच्यावर जडले. नंतर वसंतकाच्या मध्यस्थीने राजाने त्या उद्यानातच मंजुळिकेशी गांधर्वविधीने विवाह केला. ही गोष्ट वासवदत्तेला कळताच तिला खूप क्रोध आला. या अनर्थाचे कारण वसंतकच आहे, म्हणून तिने त्या राजमंत्र्याला कैद केले.

आता पुन्हा वासवदत्तेला प्रसन्न करण्यासाठी तिची क्षमा मागणे राजाला अशक्य झाले. तेव्हा तो वासवदत्तेच्या सांकृत्यायनी नावाच्या मैत्रिणीस

शरण गेला. सांकृत्यायनी एक संन्यासिनी असून वासवदत्तेच्या माहेरची होती. तिला राजाची दया आली. तिने वासवदत्तेची समजूत काढली; व तिच्या संमतीने सांकृत्यायनीने मंजुळिकेचा उदयनाशी विवाह घडवून आणला. नंतर वासवदत्तेने वसंतकास बंधमुक्त केले.

राजा उदयनाच्या मनमानेल तशा वर्तनाने यौगंधरायण फार कष्टी होत असे. मद्यपान, वीणावादन, मृगया यात राजा दंग होऊन राहिला होता. राज्यकारभाराकडे तो मुळीच लक्ष देत नव्हता. वासवदत्तेचा लाभ करून घेतल्यामुळे चंडमहासेनासारख्या पूर्वापार शत्रुत्व असलेल्यालाही उदयनाने आपला जिवलग मित्र करून सोडले होते. आता मगध देशाचा राजा प्रद्योत कौशांबीवर कधी स्वारी करील ते सांगवत नव्हते. त्यासाठी मोठ्या कुशल उपायाने प्रद्योत राजाला नात्याने जवळ करण्याचा यौगंधरायणाचा प्रयत्न चालला होता.

पण वासवदत्ता हयात असेपर्यंत आपल्या प्राणप्रिय कन्येचा, पद्मावतीचा हात उदयनाच्या हाती देण्यास प्रद्योत मुळीच तयार नव्हता. तेव्हा यौगंधरायणाने रुमण्वानाला विश्वासात घेऊन त्याला सर्व गोष्टींची कल्पना दिली. यौगंधरायणाने स्वतःच्या मनाने योजिलेली युक्ती रुमण्वानाला सांगताना तो म्हणाला, ''प्रद्योतकन्या पद्मावतीचा विवाह महाराज उदयनाशी जमविलाच पाहिजे. ते कार्य सिद्धीस जाण्यासाठी आपण देवी वासवदत्तेला कुठेतरी अज्ञात ठिकाणी दडवून ठेवू. आणि तिच्या निवासस्थानाला आग लावून ती आगीत भस्मसात झाल्याचे जाहीर करू. मग प्रद्योत उदयनमहाराजांना पद्मावती देईल. देवी वासवदत्तेच्या मरणामुळे महाराज अतिशय दुःखी होतील. पण आपण त्यांना राज्यकारभारातील महत्त्वाच्या प्रश्नात गुंतवून ठेवू. एकदा प्रद्योत महाराजांचा सासरा झाला, म्हणजे आपली चिंता दूर झाली. पुढे हा आपला गुप्त बेत उघडकीस आला तरी आपल्याला काही काळजी नाही. प्रद्योत रागावेल पण पद्मावतीच्या सुखासाठी तो आपला राग गिळून टाकील!''

प्रथम यौगंधरायणाच्या या कल्पनेला मान्यता देण्यास रुमण्वानाने खूप आढेवेढे घेतले. काही शंका उपस्थित केल्या. पण यौगंधरायणाने त्या सर्व दूर केल्या. आपल्या या गुप्त योजनेत गोपालकाला घ्यावे म्हणजे ठीक होईल अशा विचाराने यौगंधरायणाने गोपालकाकडे आपला एक दूत पाठवून त्याला

बोलावून घेतले. ती गुप्त योजना वासवदत्तेला सांगण्याचे काम गोपालकाने करायचे होते. गोपालक आल्यावर यौगंधरायणाने त्याला आपला गुप्त बेत सांगितला. तेव्हा आपल्या बहिणीच्या भावी सुखाकडे लक्ष देऊन गोपालकाने यौगंधरायणास मदत करण्याचे ठरविले.

राजा उदयन मृगयेसाठी नियमित अरण्यात जात असे जेव्हा मृगयेच्या निमित्ताने सर्वांनी मगध देशाच्या हद्दीला लागून असलेल्या लावणक प्रदेशाकडे जाण्याचे ठरविले. त्या प्रदेशाला प्रद्योताच्या सैन्याकडून नेहमीच उपद्रव होत असे म्हणून काही दिवस त्या प्रदेशाच्या संरक्षणासाठी तिथेच मुक्काम करावा हेही एक कारण तिकडे जाण्यात होते. अखेर सर्वांना बरोबर घेऊन उदयनाने लावणकास जाण्याचे निश्चित केले.

दुसऱ्या दिवशी 'नारायण नारायण' असा नामोच्चार करीत तेजस्वी अशा नारदमुनींची स्वारी राजवाड्यात आली. तेव्हा आनंदित झालेल्या उदयनाने नारदमनींचे स्वागत व आदरातिथ्य केले. देवी वासवदत्तेने नारदमुनींना भक्तिपूर्वक वंदन केले. तेव्हा "मदनाचा अंश असलेला पुत्र तुझ्या पोटी जन्माला येईल आणि तो विद्याधरांचा सम्राट होईल." असा त्यांनी तिला आशीर्वाद दिला. नंतर राजाकडे वळून ते म्हणाले, " राजन्, लवकरच तुला एका संकटास तोंड द्यावे लागणार आहे. पण तू तुझा धीर हरवून बसू नकोस. मंत्र्यांच्या सल्ल्याने वर्तन कर म्हणजे अल्पावधीतच पुन्हा सुखाचे दिवस येतील." असे म्हणून नारद अदृश्य झाले.

पुढे यौगंधरायणादि मंत्र्यांनी वत्सराजास वासवदत्तेसह लावाणक प्रदेशास नेले. एकदा राजा शिकारीसाठी गेला असताना यौगंधरायणाने स्वतः वासवदत्तेला राज्यकारभारात मदत करण्याची विनंती केली. तेव्हा त्याच्या म्हणण्यास तिने मोठ्या कष्टाने सम्मती दिली. आपल्या पतीच्या हिताकरिता कोणतेही संकट सहन करण्याची तिने आपल्या मनाची तयारी केली. नंतर यौगंधरायणाने वेषांतर करण्याचा उपाय अंमलात आणला. त्याने स्वतः वृद्ध ब्राह्मणाचे रूप घेतले. वासवदत्ता एक तरुण ब्राह्मण कन्या झाली. व वसंतक एक काणा बटुक झाला. अशा रीतीने वेषांतर केलेल्या त्या सर्वांना बरोबर घेऊन यौगंधरायण मगध देशास जाण्यास निघाला.

त्या समयी वासवदत्ता शरीराने मगध देशाकडे निघाली होती खरी, पण तिचे चित्त मात्र उदयनाकडे लागले होते. इकडे रुमण्वानाने वासवदत्तेच्या

महालाला आग लावली व "हाय ! हाय ! आमची देवी वसंतकासह जळून भस्म झाली," अशी आरडाओरड सुरू केली. ती आग एवढी भयंकर होती की, ती विझवणे कोणालाही शक्य झाले नाही. लावाणक मुक्कामात वासवदत्ता जळून मेली, ही वार्ता वाऱ्यासारखी चौफेर पसरली. संध्याकाळी वत्सराज शिकारीहून आपल्या शिबिरास जेव्हा परत आला, तेव्हा मंत्र्यांनी ती दुःखद घटना त्याला सांगितली. तेव्हा अत्यंत दुःखित होऊन राजा मूर्च्छित पडला.

वासवदत्ता जिवंत नाही, तेव्हा आपण जगून तरी काय करायचे, अशा विचाराने उदयनाने देहत्यागाचा निश्चय केला. त्यावेळी त्याला नारदाने वासवदत्तेला दिलेल्या आशीर्वादाची आठवण झाली. त्याचप्रमाणे तुला थोडेसे दुःख होईल असे नारदमुनींच्या शब्दाचे त्याला स्मरण झाले. गोपालकाची मुद्राही फारशी दुःखी दिसली नाही. तेव्हा वासवदत्ता कदाचित जिवंत असेल असे राजाला वाटले, आणि त्याने आपले दुःख आवरते घेतले.

तिकडे यौगंधरायण, वासवदत्ता व वसंतक यांच्यासह मगध नगरीस पोहोचला. त्यावेळी पद्मावती उद्यानात विहार करीत होती. वासवदत्तेला पाहताच पद्मावतीला खूपच प्रसन्न वाटू लागले. तिने त्यांची विचारपूस केली. तेव्हा यौगंधरायण तिला म्हणाला, "राजकन्ये, खरंच मी फार दुर्दैवी आहे." नंतर वासवदत्तेकडे बघत तो पुढे म्हणाला, "ही अवंतिका नावाची माझी लाडकी मुलगी. हिला चांगल्या घरात दिली. पण या बिचारीचा नवरा व्यसनी निघाला. हिचा त्याग करून तो कोठे निघून गेलाय त्याचा पत्ता नाही. त्याच्या शोधार्थ मी जाणार आहे. तोपर्यंत ही माझी अवंतिका आणि हा तिचा काणा भाऊ तुझ्यापाशी राहतील. कृपा करून तू त्यांना आश्रय दे. नाही म्हणू नकोस." असे सांगून अखेर यौगंधरायणाने त्या दयाळू पद्मावतीची सम्मति प्राप्त केली. आणि त्या दोघांना तिच्या स्वाधीन करून तो निघून गेला.

नंतर पद्मावतीने त्या दोघांचा सत्कार केला. आणि मोठ्या प्रेमाने ती त्यांना राजवाड्यात घेऊन गेली. पद्मावती अवंतिकेला आपल्या थोरल्या बहिणीप्रमाणे वागवू लागली. वासवदत्तेच्या वागण्याचालण्यावरून व तिच्या लावण्यावरून ती कोणी सामान्य ब्राह्मण स्त्री नसून एखादी मोठ्या कुळातील दिव्य स्त्री असावी असे पद्मावतीस वाटत होते. एकदा उदयनापासून शिकलेल्या अपूर्व विद्येने, नेहमी टवटवीत राहाणारी पुष्पमाला अवंतिकेने

पद्मावतीच्या गळ्यात घातली व कधीही न सुकणारा तिलक तिच्या कपाळाला लावला. ती अद्‌भुत माळ व तो विलक्षण तिलक पामून पद्मावतीची आई पद्मावतीला म्हणाली," मुली, तुला ही माळ व तो तिलक कोणाकडून मिळाला ?" "आई" पद्मावती म्हणाली, "अवंतिका नावाची एक ब्राह्मण स्त्री माझ्या आश्रयाला आली आहे. तिने ह्या वस्तू मला दिल्या." तेव्हा पद्मावतीची आई म्हणाली, "अस्सं! मग ती सामान्य स्त्री नसून कोणीतरी देवता आहे. कारण मनुष्य स्त्रीला असल्या गोष्टी प्राप्त होणे शक्य नाही. तेव्हा तू तिची मोठ्या प्रेमाने काळजी घे." असे आपल्या आईचे बोलणे ऐकून पद्मावती वासवदत्तेला जास्तच सन्मानाने वागवू लागली. पतिविरहाच्या दुःखामुळे वासवदत्ता जेव्हा अतिशय खिन्न होई, तेव्हा काणा बटु म्हणजे वसंतक तिला मजेदार गोष्टी सांगून तिचे मनोरंजन करी.

मगधराज प्रद्योताला वासवदत्ता लावाणक शिबिरात जळाल्याची वार्ता समजली होती. पूर्वी यौगंधरायणाने वत्सराजासाठी पद्मावतीला मागणी घातली होती, ही गोष्ट त्याच्या ध्यानात होतीच. म्हणून त्याने आपला एक खास दूत वत्सराजाकडे पाठवला. यौगंधरायणाच्या सल्ल्याने वत्सराजाने पद्मावतीचा स्वीकार करण्याची प्रद्योताची विनंती मान्य केली. "आजपासून सातव्या दिवशी उदयन महाराज विवाहासाठी आपल्याकडे येतील. लवकर विवाह झाला म्हणजे त्यांना वासवदत्तेचे विस्मरण पडेल." असा निरोप आपल्या दूताकडून यौगंधरायणाने प्रद्योताला पाठवला. तो ऐकून मगधराजाला व त्याच्या परिवारास अतिशय आनंद झाला. फक्त एक वासवदत्ताच अतिशय कष्टी झाली होती.

लग्नाची तयारी जोरात सुरू झाली. लग्नाचा मुहूर्त जवळ आला तेव्हा निश्चित केलेल्या दिवशी वत्सराज, मंत्री, सैन्यासह मगधनगरीत आला तेव्हा राजा प्रद्योत त्याच्या स्वागतासाठी मोठ्या आनंदाने पुढे झाला. मोठ्या थाटामाटाने शृंगारलेल्या नगरीत वत्सराजाचे आनंदभरित होऊन स्वागत केले. त्यानंतर भरजरी वेशभूषा केलेली अलंकारमंडित चंद्रमुखी पद्मावती जेव्हा लग्नमंडपात आली, तेव्हा तिच्या सौंदर्याने राजा उदयनाचे डोळे दिपले. तिच्या गळ्यातील आपली दिव्य माळ व कपाळावरील तिलक पाहून उदयन आश्चर्यचकित झाला. त्या गोष्टी पद्मावतीला कशा मिळाल्या असा त्याला प्रश्न पडला. पण त्यासंबंधी विचार करण्याची तो योग्य वेळ नव्हती. लग्नवेदीवर

जाऊन उदयनाने पद्मावतीचे पाणिग्रहण केले. पण त्याच्या अंतःकरणातील वासवदत्तेची मूर्ती काही ढळली नाही. एकंदरीत तो लग्नसोहळा वैभवात, कोणत्याही प्रकारचे विघ्न न येता साजरा झाला.

आता यौगंधरायणाला अशी भीती वाटू लागली की, वत्सराज अंतःपुरात गेले तर त्याची व वासवदत्तेची भेट होईल. तसे झाले तर आपल्या रहस्याचा उलगडा होऊन आतापर्यंत केलेला सर्व खटाटोप व्यर्थ होईल. म्हणून तो लगबगीने राजा प्रद्योताकडे जाऊन त्याला विनंतीपूर्वक म्हणाला, "महाराज, आजच कौशांबीला प्रयाण करण्याची आमच्या महाराजांची इच्छा आहे. त्याला आपली सम्मती असावी." यौगंधरायणाची ती विनंती मान्य करण्यासाठी राजाने खूप आढेवाढे घेतले पण अखेर त्याला सम्मती द्यावी लागली.

राजा प्रद्योताने सन्मानपूर्वक वत्सराजाला निरोप दिला. नंतर वत्सराज पद्मावतीला बरोबर घेऊन आपल्या मंत्र्यासह कौशांबीकडे निघाला. पद्मावतीने पाठवलेल्या एका खास रथातून वासवदत्ता वसंतकासह गुप्त रीतीने सर्व सैन्याच्या मागून निघाली. पुढे लावाणकास पोहोचल्यावर वत्सराज पद्मावतीसह आपल्या नवीन शिबिरात गेला ; आणि वासवदत्ता गोपालकाच्या निवासस्थानी गेली व रडू लागली. त्याच वेळी यौगंधरायण व रुमण्वान तेथे आले. वासवदत्तेची करुण अवस्था पाहून त्यांनाही दुःख झाले. यौगंधरायण तिचे समाधान करू लागला. त्याच वेळी तिच्याबरोरबर आलेले सेवक पद्मावतीकडे गेले, आणि तिला म्हणाले, "देवी, आपल्या आज्ञेप्रमाणे आम्ही अवंतिकेला सुरक्षित पणे येथे आणले. तेथे येताच आम्हास सोडून ती गोपालकाच्या घरी गेली." असे त्या सेवकाचे शब्द ऐकून साशंक झालेली पद्मावती त्यांना म्हणाली, "तुम्ही सत्वर तिकडे जा आणि अवंतिकेला सांगा की, तुझ्या वडिलांनी सर्व जबाबदारी माझ्यावर सोपविली आहे. तेव्हा मला विचारल्याशिवाय तुला कोठेही जाती येत नाही. तू ताबडतोब माझ्याकडे निघून ये." याप्रमाणे निरोप घेऊन सेवक निघून गेले.

पुढे पद्मावतीबरोबर बोलत असताना उदयनाने तिला विचारले "ही न सुकणारी माळ व न सुकणारा तिलक तुला कोणी दिला ?" तेव्हा पद्मावती म्हणाली, "सुमारे आठ दिवसांपूर्वी एका गरीब वृद्ध ब्राह्मणाने व्यसनी नवऱ्याने त्यागिलेली आपली अवंतिका नावाची मुलगी माझ्या स्वाधीन केली आहे. तिची

ही देणगी आहे. तिलाच घेऊन येण्यासाठी मी आपल्यासमोरच सेवकांना पाठविले आहे." असे पद्मावतीच्या तोंडचे शब्द ऐकताच वत्सराजाची खात्री पटली की अवंतिका म्हणजेच वासवदत्ता!

मग काय, उदयन लगेच गोपालकाच्या निवासस्थानाकडे गेला. तेथे आपले दोन मंत्री, गोपालक व एक काणा बटु हे सर्वजण एका ब्राह्मण तरुणीचे सांत्वन करीत असलेले त्याला दिसले. तिथे राजाच्या झालेल्या अचानक आगमनामुळे सर्वांची त्रेधातिरपिट उडाली. तेवढ्यात वासवदत्तेने धावतच जाऊन राजाच्या पायाला मिठी मारली व दुःखावेगाने ती मूर्च्छित पडली. आपल्या प्रिय वासवदत्तेची ती अवस्था पाहून उदयन राजाही मूर्च्छित झाला.

तेव्हा तिथे बराच गोंधळ उडाल्यास नवल नाही. तो गोंधळ ऐकून अतिशय घाबरलेली पद्मावतीही तेथे आली. सर्व हकीकत ऐकल्यावर राजा व वासवदत्ता ह्यांच्यासारखीच तिचीही अवस्था झाली. राजा व वासवदत्ता सावध झाल्यावर यौगंधरायण हात जोडून म्हणाला, "महाराज, मगधाधिपतीशी नात्याचे संबंध जोडून आपले साम्राज्य वाढविण्याच्या महत्त्वाकांक्षेने मी असा डाव टाकला. त्याबद्दल आपण मला क्षमा करा. यात महाराणींचा काही दोष नाही. प्रवासदशेतील महाराणींच्या शीलाची साक्ष ही देवी पद्मावती देईल."

असे यौगंधरायणाचे बोलणे ऐकून पतीच्या कल्याणासाठी महाराणीने केलेले दिव्य पाहून पद्मावतीचे अंतःकरण भरून आले. ती मोठ्या प्रेमाने वासवदत्तेला भेटली. यौगंधरायणाच्या कारस्थानाचा सद्धेतु कळल्यावर राजाला आपल्या बुद्धिवान, चतुर व धोरणी महामंत्र्याचे फार कौतुक वाटले. त्याच वेळी आकाशवाणी झाली, "हे राजन, ज्याचा मंत्री यौगंधरायण व ज्याची भार्या वासवदत्ता आहे, तो तू खरोखरच धन्य आहेस. देवी वासवदत्ता सर्वस्वी पवित्र आहे. मोठ्या आनंदाने तू तिचा स्वीकार कर." अशी आकाशवाणी ऐकून राजासह सर्वजण आनंदित झाले.

दुसऱ्या दिवशी प्रसन्नमुखाचा वत्सराज आपल्या सर्व परिवारासह कौशांबीकडे निघाला. त्यापूर्वी राजा प्रद्योतला घडलेला वृत्तांत समजला. राणी पद्मावतीनेही आपण आनंदात असल्याचा निरोप आपल्या एका खास दूताकडून माहेरी पाठविला होता. त्यामुळे आपल्याबरोबर कपट केले गेले या गोष्टीचा प्रद्योताला मुळीच राग आला नाही. त्याने आपला एक खास दूत

उदयनाकडे पाठवून उदयनाचे अभीष्टचिंतन, आणि बुद्धिमान व चतुर यौगंधरायणाच्या कुशल राजनीतीचे कौतुक केले. राजा प्रद्योताप्रमाणे वासवदत्तेचे वडील चंडमहासेन यांनाही सर्व वृतांत कळला होता. आपल्या मुलीनेच यौगंधरायणाच्या रहस्यात भाग घेतलेला होता. त्यामुळे त्याला काहीच बोलणे शक्य नव्हते. प्रद्योताच्या कन्येशी आपल्या जावयाने विवाह करून आपले सामर्थ्य चांगलेच वाढविले याबद्दल त्याला आनंदच झाला. त्याने एक खास दूत पाठवून उदयनाचे अभिनंदन केले.

एके दिवशी वत्सराज आपल्या मंत्र्यांसह राजसभेत बसला असता, तेथे कोणी एक ब्राह्मण आला. तो म्हणाला, ''अन्याय झाला! अन्याय झाला! राजा तुझ्या नगरात न्याय दिसत नाही. अरण्यात दुष्ट गवळ्याच्या मुलांनी बिनापराधी अशा माझ्या मुलाचा पाय तोडला. या बाबतीत मला न्याय मिळाल्याखेरीज मी येथून हलणार नाही.'' तेव्हा राजाने ताबडतोब गवळ्यांच्या मुलांना बोलावून घेतले. आणि ब्राह्मणपुत्राचा पाय का तोडला म्हणून विचारले. तेव्हा त्यांच्यापैकी एकजण म्हणाला, ''महाराज, आम्ही गायी राखण्याचे काम करतो. आमच्यापैकी देवसेन नावाचा एक मित्र आहे. तो अरण्यातील एका शिलेवर बसतो. मी तुमचा राजा असे म्हणून तो आम्हाला आज्ञा करतो. तो जे सांगेल ते करावे असे आम्हाला वाटतेच. त्याची आज्ञा मोडण्याचे आम्हास त्यावेळी सामर्थ्य नसते. आज या ब्राह्मणाचा मुलगा त्या बाजूने जात होता. त्याने आमच्या राजाला नमस्कार केला नाही. 'अरे, राजाज्ञा मोडू नकोस' असे आम्ही त्याला सांगितले. पण आमची टिंगल करीत तो पुढे चालला. तेव्हा रागावलेल्या आमच्या राजाने त्याचा पाय तोडण्याची शिक्षा सांगितली, ती शिक्षा आम्ही अंमलात आणली.'' असे त्या गवळ्याच्या मुलाचे बोलणे ऐकून राजसभेतील सर्वांनाच आश्चर्य वाटले.

यौगंधरायण मात्र विचारमग्न झाला. त्या घटनेमागे काही तरी गूढ असावे, असे त्याला वाटू लागले. म्हणून तो राजाला म्हणाला, ''महाराज, ज्या शिळेवर बसून एखाद्या गवळ्याच्या मुलाने दिलेली आज्ञा बाकीची मुले शिरसावंद्य मानतात, त्याअर्थी ती शिळा साधीसुधी नसावी. खरोखरच त्या ठिकाणी मोठी संपत्ती किंवा एखादी बहुमूल्य वस्तू असावी. तेव्हा आपणासमक्ष तेथे जाऊन खरा प्रकार काय आहे ते पाहू या. नंतरच आपण या ब्राह्मणास न्याय द्यावा.'' यौगंधरायणाच्या सल्ल्याप्रमाणे उदयन सैनिक व मंत्री यांना

बरोबर घेऊन आणि गवळ्यांच्या मुलांना पुढे घालून त्या अरण्याकडे जाण्यास निघाला.

त्या ठिकाणी पोहोचल्यावर यौगंधरायणाने शिळायुक्त जागेची तपासणी केली. आणि शिळेच्या जवळच खणण्यास त्याने सेवकांना सांगितले. सेवकांनी बराच वेळ खणले. तेव्हा तेथे तयार झालेल्या खळग्यातून एक मोठा यक्ष एकदम प्रकट झाला. तो राजाला म्हणाला, "राजंन्, तुझ्य आजोबाने पुरून ठेवलेल्या संपत्तीचे मी आजपर्यंत रक्षण केले. आता ती तू आपल्या ताब्यात घे." असे म्हणून राजा त्याच्याशी काही बोलू लागणार तोच तो यक्ष एकाएकी गुप्त झाला. आणि खळग्यात भलीमोठी संपत्ती प्रकट झाली. ती वर काढून घेताच खाली एक भले मोठे सुवर्णाचे रत्नजडित सिंहासन दिसू लागले. राजाने ते वर काढून घेतले. नंतर त्याने सिंहासनासह सर्व संपत्ती राजवाड्यात आणली. आणि एका महालात सन्मानपूर्वक त्या सिंहासनाची स्थापना केली.

आता ब्राह्मणाला न्याय देण्यासाठी गवळ्याच्या मुलांना कडक शिक्षा देणे योग्य होते. पण सिंहासनाच्या प्रभावामुळे त्यांनी जे पाय तोडण्याचे कृत्य केले, ते राजाने थोडेफार क्षम्य मानले. व मुलांना सौम्य शिक्षा दिली. राजाला प्राप्त झालेले सुंदर सिंहासन व भलामोठा खजिना पाहून नागरिकांनी वाद्यांच्या गजरात मोठा आनंदोत्सव केला. त्यानंतर एके दिवशी यौगंधरायण राजाला म्हणाला, "महाराज, वंशपरंपरेने आपल्याला प्राप्त झालेल्या सिंहासनावर आपण बसत जावे." तेव्हा राजा त्याला म्हणाला, "माझ्या पूर्वजांनी दिग्विजय केल्यावरच ते या सिंहासनावर बसले. तेव्हा त्यांच्याप्रमाणेच मी दिग्विजयी होऊन सिंहासनावर आरूढ होईन. तेव्हा त्या दृष्टीने तुम्ही सर्वजण उद्योगाला लागा."

राजाज्ञेप्रमाणे यौगंधरायणाने दिग्विजयाला आवश्यक अशी तयारी केली. व त्यासाठी पवित्र अशा पूर्व दिशेकडे प्रथम प्रयाण करण्याची त्याने उदयन राजाला विनंती केली. तेव्हा आपल्या यौगंधरायणासह सर्व मंत्र्यांचा मोठा उत्साह पाहून राजा त्याला म्हणाला, "मंत्रीवर्य, तुमचा सर्वांचा सल्ला व आमचा पराक्रम यांनी मी दिग्विजयी होईन. पण या महान कार्यात येणारी संकटे नाहीशी करण्याकरिता महेश्वराची कृपा असणेही आवश्यक आहे. तेव्हा आपण तीनचार दिवस थांबू. त्या अवधीत मी श्रीशंकराची उपासना करतो."

असे म्हणून राजा उदयनाने आपल्या राण्यांसह मनोभावे शंकराची उपासना केली. तिसऱ्या दिवशी राजाला श्रीशंकराचा दृष्टांत झाला. "वत्सा, तुला निर्विघ्नपणे जय मिळेल." असा कृपाप्रसाद राजाला मिळाला. ही अत्यानंदाची वार्ता ऐकून सर्वत्र आनंदीआनंद झाला. दुसऱ्या दिवशी उदयनाने आपल्या चतुरंग सेनेसह दिग्विजयासाठी पूर्व दिशेकडे प्रयाण केले.

मार्गात उदयनाच्या शत्रूंनी नाना प्रकारची विघ्ने आणून त्याला अडविण्याचा व त्रास देण्याचा प्रयत्न केला. त्यांनी मार्गावरील वृक्ष, वेली, तळी, गवत, यावर विषारी पदार्थ टाकून राजाच्या सैन्याला ती निरूपयोगी करून टाकली. पण गुप्त हेरांकडून आधीच मिळालेल्या बातमीने यौगंधरायणाने वेळीच योग्य ती उपाययोजना केली. त्याने आपल्या सैन्यात शिरलेल्या हेरांना व मारेकऱ्यांना पकडून ठार केले. सर्वच राजांना उदयन अजिंक्य आहे असे वाटू लागले. वाराणसीचा ब्रह्मदत्त राजा उदयनाचा मोठा शत्रू होता. त्याने उदयनाच्या पराक्रमापुढे शरणागती पत्करली. फारसा प्रतिकार न करणारे विचारवंत राजे उदयनापुढे नमले, तर काही उद्धट राजांची युद्धात उदयनाच्या चतुरंग सैन्याने दाणादाण उडविली.

अशा तऱ्हेने पूर्व, पश्चिम, दक्षिण व उत्तर या दिशांना असलेल्या सर्व राजांना जिंकून वैभवशाली उदयन विजयश्रीसह आपल्या कौशांबी नगरीत परत आला. नंतर नगरात साजरा झालेला विजयोत्सव पुढे कित्येक दिवस साजरा होत राहिला. नंतर एका शुभ मुहूर्तावर दिग्विजयी राजा उदयन आपल्या वाडवडिलांच्या रत्नजडित सिंहासनावर बसला. आपल्या राज्यकार्यधुरंधर मंत्र्यांच्या सल्ल्याने तो पृथ्वीचे पालन करू लागला.

पुढे सम्राट उदयनाने पुत्र प्राप्तीसाठी महाराणी वासवदत्तेसह श्रीशंकराची आराधना सुरू केली. त्यासाठी त्याने कडक उपोषणाचे व्रत धरले. तीन दिवस नि रात्र उपोषण केलेल्या त्या दंपत्तीस अखेर श्रीशंकर प्रसन्न झाले. ते म्हणाले, "माझ्या कृपेने तुम्हाला लवकरच पुत्र होईल. व तो पुढे विद्याधरांचा सार्वभौम राजा होईल. तुम्ही आता या व्रताची समाप्ती करा." या वरप्राप्तीमुळे राजा व महाराणीला अत्यानंद झाला. नंतर दोनतीन दिवसांनी एका जटाधारी दिव्य पुरुषाने वासवदत्तेच्या स्वप्नात येऊन तिला एक फळ दिले. हे वृत्त राणीच्या तोंडून ऐकताच आता आपली इच्छा लवकरच सफळ होणार अशी वत्सराजांची खात्री झाली.

नंतर काही महिन्यांनी वासवदत्तेला पुत्ररत्न झाले. त्यावेळी अशी आकाशवाणी झाली : "राजन, विद्याधरांचा भावी सम्राट राजपुत्राच्या रूपाने जन्मास आला आहे. हा कामदेवाचा अवतार आहे. तू त्याचे नाव 'नरवाहनदत्त' असे ठेव." अशी आकाशवाणी झाल्यानंतर पुष्पवृष्टी झाली. त्याच सुमारास उदयनराजाच्या मंत्र्यांसही मुलगे झाले. त्यांच्या जन्मवेळीही आकाशवाणी झाली की, हेच मुलगे पुढे नरवाहनदत्ताचे सामर्थ्यशाली मंत्री होतील.

उदयनाने नरवाहनदत्ताला सर्व विद्या, कला व शास्त्रात प्रवीण केले. आकाशवाणीप्रहाणे पुढे नरवाहनदत्त विद्याधरांचा सम्राट झाला. चंडमहासेनाच्या मृत्यूनंतर त्याचा दुसरा मुलगा पालक यास उदयनाने उज्जयिनीची राजा केले. व त्याचा थोरला भाऊ गोपालक याला कौशांबीचे राज्य दिले.

नंतर वत्सराज उदयन आपल्या वासवदत्तादि राण्यांसह आणि यौगंधरायणादि मंत्र्यांसह आपल्या प्रजेचा अखेरचा निरोप घेऊन कालंजर पर्वतावर गेला. तिथे घोषवती वीणा हाती घेऊन त्याने सर्वांसह देहत्याग केला व त्या क्षणी तिथे आलेल्या एका दिव्य विमानातून तो स्वर्गाला गेला.

# पराक्रमी विदूषक

खूप वर्षांपूर्वी उज्जयिनी नगरात आदित्यसेन नावाचा एक शूर राजा राज्य करीत होता. तो मोठा पराक्रमी होता. आपल्या पराक्रमाने सर्व राजांना जिंकून घेऊन सैन्यासह गंगा नदीच्या तीरावर मुक्काम केला. त्यावेळी गुणवर्मा नावाचा एक ब्राह्मण आपल्या तेजस्विनी नावाच्या सुंदर कन्येला घेऊन राजाच्या शिबिरात आला व राजाला म्हणाला, "महाराज, तेजस्वी रत्नासारखी ही माझी कन्या तेजस्विनी दुसऱ्या कोणाच्या हाती न देता आपल्याच हाती द्यावी म्हणून मी येथे आलो आहे. आपण तिचा स्वीकार करावा अशी माझी विनंती आहे."

तेजस्विनीचे अलौकिक सौंदर्य पाहून राजा थक्क झाला आणि मोहित झाला. पट्टराणी म्हणून ती आपणास योग्य आहे असे त्याला वाटले. राजाने त्याला पुष्कळ संपत्ती देऊन आनंदित केले. पुढे एका शुभ मुहूर्तावर राजाने तेजस्विनीशी समारंभपूर्वक विवाह केला. पुढे तिच्या सहवासात नृत्यगीतादि कार्यक्रमात तो एवढा दंग होऊन गेला की, राज्यकारभाराकडे त्याचे दुर्लक्ष होऊ लागले. त्याची प्रजाहितदक्षता नाहीशी झाली. तो पूर्णपणे सुखोपभोगात मग्न झाला. काही दिवसांनी त्या राजास एक मुलगी झाली. त्यावेळी राजाला आपण विजयासाठी बाहेर पडावे असे वाटले. हा मुलीचा पायगुणच आहे, अशी त्याची कल्पना झाली. राजकन्या एखाद्या नक्षत्रासारखी सुंदर होती. राजाने मोठ्या थाटाने तिचे बारसे करून रत्नप्रभा असे तिचे नाव ठेवले.

एके दिवशी राजा अदित्यसेन दुसऱ्या एका सामंत राजावर स्वारी करण्यासाठी बाहेर पडला. राणी तेजस्विनीही एका हत्तीणीवर बसून त्याच्याबरोबर निघाली. त्यावेळी ती एवढी तेजस्वी दिसत होती की जणू काही ती सैन्याची शक्तिदेवताच आहे, असे कोणालाही वाटावे. राजा स्वतः उंच व चपळ अशा आपल्या आवडत्या घोड्यावर बसला होता. त्या घोड्याची वेगवान चाल तसाच आपला पराक्रम तेजस्विनीला दाखवावा म्हणून त्याने



घोड्याला टाच मारली. चाबकाच्या दोरीचा घोड्याच्या पाठीला. स्पर्श होताच तो वाऱ्याच्या वेगाने पळू लागला आणि काही क्षणातच दिसेनासा झाला. तेव्हा राणीने हजारो घोडेस्वार राजाच्या शोधार्थ चौफेर पिटाळले. पण कोणालाही राजाचा शोध लागला नाही. राजा एकाएकी नाहीसा झाल्याने सैन्यात गोंधळ उडाला. शत्रूवर चाल करून जाण्याच्या वेळी हा एक मोठाच अपशकून झाला असे वाटून मंत्री शोकाकुल राणीला बरोबर घेऊन सैन्यासह नगराकडे परतले.

तिकडे त्या चपळ वेगवान घोड्याने राजाला हिंस्त्र पशूंनी भरलेल्या व दुर्गम अशा विंध्यारण्यात नेले. तेथे तो निर्भय घोडा एका दाट झाडीत उभा राहिला. गोंधळलेल्या राजाला आपण कोठे आलो आहोत हे कळेना. आता येथून परत कसे जावे हेही त्याला कळेना. त्याला दिशाही समजेनात. अखेर अश्वपरीक्षा जाणणारा राजा खाली उतरला. हा घोडा असामान्य आहे, हे तो जाणून होताच. घोड्याच्या पाठीवर मोठ्या प्रेमाने थाप मारून तो त्याला म्हणाला, "मित्रा, तू मला एकाएकी असे भलत्याच भयंकर जागी का आणून सोडलेस ? तुझ्यासारखे मुके प्राणी आपल्या धन्याचा विश्वासघात कधी करत नाहीत. आता, इथे तूच एकमेव माझा आधार आहेस. तेव्हा आता या

अरण्यातून सुरक्षितपणे मला नगराकडे घेऊन चल.''

असे राजाचे शब्द ऐकून जणू काही त्याची विनंती आपल्याला कळली, असे त्या घोड्याने आपली मान हलवून दाखविली. नंतर राजा पुन्हा घोड्यावर स्वार होताच त्या घोड्याने राजाला सुरक्षित मार्गाने जाऊन शंभर योजने दूर असलेल्या उज्जयिनी नगरीत नेले. तेव्हा संध्याकाळ झाली होती. चहूकडे अंधार पडू लागला होता. नगराच्या सुरक्षिततेकरिता संध्याकाळ होताच नगराच्या वेशी बंद झालेल्या होत्या. तेव्हा नगराबाहेर असलेल्या स्मशानातील एका कोपऱ्यात असलेल्या मठात मुक्काम करावा असा विचार करून राजा तिकडे निघाला. लवकरच तो मठाजवळ पोहोचला व मठाच्या दारावर त्याने जोराने थाप मारली. रात्रीच्या भयंकर वेळी दार ठोठावणारा एखादा चोर असावा किंवा एखादे भूत असेल असे वाटून मठातील ब्राह्मणांनी मुळीच दार उघडायचे नाही असा निर्णय घेतला.

त्यांच्यापैकी एक गुणी व धैर्यशाली ब्राह्मण होता. त्याचे नाव विदूषक होते. त्या तरुण व शूर ब्राह्मणाने अग्नीची उपासना करून, स्मरण करताच जवळ येणारी अशी एक दिव्य तलवार मिळविली होती. इतर ब्राह्मणांचा विचार त्याला मुळीच आवडला नाही. त्यांना मागे सारून विदूषकाने दार उघडले व तो बाहेर आला. समोर उभ्या असलेल्या राजाची भव्य व सुंदर मूर्ती पाहताच हा कोणीतरी वेषधारी देव असावा असे त्यास वाटले. विदूषकाने त्याची विचारपस करताच तो राजा आहे असे त्याला समजले. तेव्हा त्याने सन्मानपूर्वक राजाला मठात नेले व आपल्याकडून शक्य तितके चांगले आदरातिथ्य केले. राजाच्या थकलेल्या घोड्याच्या चारापाण्याची व्यवस्था केली. राजाचा फराळ झाल्यावर विदूषकाने स्वतः राजाला बिछाना अंथरून दिला. नंतर तो राजाला म्हणाला, ''महाराज आपण निःशंकपणे निद्रा करा. आपल्या रक्षणार्थ मी जागाच आहे. आपणास काळजीचे मुळीच कारण नाही.'' राजाला विदूषकाच्या वागण्याची कृतज्ञता वाटली. अतिशय थकल्यामुळे बिछान्यावर पडताच त्याला गाढ झोप लागली. तेव्हा विदूषक, स्मरण करताच जवळ आलेली तलवार हाती घेऊन दारावर पहारा करीत उभा राहिला.

सकाळ होताच रात्रभर जागे राहून आपल्या रक्षणार्थ पहारा करीत असलेल्या विदूषकाला राजाने पाहिले. राजा उठलेला पाहताच विदूषकाने

त्याचा घोडा सज्ज केला. राजाने कपडे केले. विदूषकाचे आभार मानून तो तेथून निघाला व आपल्या नगरात आला. राजाच्या आगमनाची वार्ता वाऱ्यासारखी चहूकडे पसरली. राजाला पाहण्यासाठी लोकांनी ही गर्दी केली तेजस्विनी मोठ्या आनंदाने राजाला भेटण्यास पुढे गेली. तिच्या डोळ्यातून झरझर वाहिलेल्या पाण्याचे आता आनंदाश्रु झाले होते. तिच्या आज्ञेवरून राजाच्या आगमनाप्रीत्यर्थ सर्व दिवसभर मोठा उत्सव साजरा करण्यात आला.

नंतर दुसऱ्या दिवशी आदित्यसेन राजाने एक खास दूत पाठवून विदूषकाला बोलावून घेतले. तो आल्यावर राजाने त्याला राजसभेत नेऊन एका उत्तम आसनावर बसवले. नंतर राजाने रात्री घडलेली सर्व हकीकत राजसभेत सांगितली व आपल्या कृतज्ञतेची भेट म्हणून त्याने विदूषकाला एक हजार गावे बक्षीस दिली, आणि आपला पुरोहित म्हणून त्याची नेमणूक केली. राजाच्या त्या उदार कृतीने उपकारी विदूषक भारावून गेला. तोही मोठ्या मनाचा होता. राजाने इनाम दिलेल्या हजार गावांची सत्ता त्याने मठातील आपल्या मित्रांमध्ये सारखी वाटून दिली. त्यांच्याबरोबर त्यानेही एक वाटा गेतला. आणि सर्वजण सुखाने राहू लागले.

पुढे काही दिवसांनी फुकट मिळालेली सत्ता व संपत्ती यामुळे ते ब्राह्मण गर्विष्ठ झाले. लुबाडून आपण मोठे व्हावे व सर्व गावांची सत्ता आपल्या हाती घ्यावी असे प्रत्येकास वाटू लागले. ते एवढे उन्मत्त झाले की, ते आपल्या अन्नदात्या विदूषकाचीही कदर करीनासे झाले. त्यांच्या आपसातील कलहामुळे गावकऱ्यांचे हाल होऊ लागले. तेव्हा आपण केले काय नि झाले काय, असे विदूषकाला वाटले. तो फार कष्टी झाला. एकदा त्या सर्व ब्राह्मणांत सत्तेबद्दल भांडण चालू असताच तिथे चक्रधर नावाचा एक ब्राह्मण आला. तो स्वभावतःच न्यायनिष्ठुर होता. ब्राह्मणांचे सर्व म्हणणे ऐकल्यावर तो स्पष्टवक्ता चक्रधर त्यांना म्हणाला, "अरे चोरांनो, तुम्ही मूळचे भिक्षा मागून पोट भरणारे! उदार विदूषकाने तुम्हाला ग्रामाधिपती केले. तेव्हा दैवयोगाने तुम्हाला जी संपत्ती मिळाली तिचा आनंदाने उपभोग घेण्याचे सोडून तुम्ही एकमेकाशी भांडून ग्रामाचा नाश का करता ? खरं म्हणजे तुम्हाला गाव देण्यात विदूषकाची चूक झाली. लक्षात ठेवा, तुम्ही असेच भांडत बसलात तर पुन्हा भीक मागण्याची पाळी तुमच्यावर येईल. तेव्हा तुमच्यापैकी पुढारी म्हणून जो योग्य ठरेल त्याच्या हाती सत्ता द्या व इतर सर्व त्याचे मदतनीस म्हणून राहा."

असे चक्रधराचे बोलणे ऐकून प्रत्येकाला आपणच पुढारी म्हणून योग्य आहोत असे वाटू लागले. त्यावरून पुन्हा त्यांच्यात कलह सुरू झाला. तेव्हा चक्रधर पुन्हा त्या मूर्खांना म्हणाला, "हे पाहा, तुम्ही सर्वजण एक गोष्ट लक्षात ठेवा. ज्याला पुढारी व्हायचे आहे तो स्वतः शूर व धाडसी असला पाहिजे. आज तीन चोरांना स्मशानात सुळावर चढविले आहे. मध्यरात्री तेथे जाऊन जो त्यांची नाके कापून आणील तोच तुमचा पुढारी किंवा नायक होण्यास योग्य ठरेल. कारण वीर पुरुषच नायक होण्यास योग्य असतो. आहे का तशी तुमची तयारी ?" विदूषक तिथेच होता. तो म्हणाला, "चांगली कल्पना आहे." नंतर ब्राह्मणांकडे वळून तो म्हणाला, "तुमच्यापैकी जो साहसी असेल त्याने हे काम करून नायकपद मिळवावे."

ते भयंकर काम करण्याची तयारी उघडपणे प्रत्येकाने दाखवली पण रात्र झाल्यावर ते काम करणे प्रत्येकजण टाळू लागला. सारेच भित्रे निघाले. तेव्हा साहसी विदूषक त्यांना म्हणाला, "तुमची कोणाचीच तयारी नसेल, तर मी चोरांची नाके कापून आणण्यास तयार आहे." तेव्हा विदूषकाचे मित्र म्हणाले, "ते भयंकर कृत्य तू केलेस तर आमचा पुढारी तूच होशील. त्याला आमची सम्मती आहे." असे ठरल्यावर त्या सर्वांचा निरोप घेऊन विदूषक स्मशानाकडे जाण्यास निघाला. वाटेत, स्मरण करताच प्रगट झालेली तलवार त्याने हातात धरली. ती दिव्य तलवार घेऊन विदूषक धीटपणे स्पशानात गेला. तेथील भयंकर दृश्य कोणाही धीट माणसाचा भीतीने थरकाप उडविणारे होते.

साहसी विदूषक न डगमगता चोरांच्या प्रेताजवळ गेला. आणि तो आपल्या तलवारीने चोरांची नाके तोडणार, तोच प्रेतात शिरलेल्या वेताळांनी विदूषकाला जोराने ठोसे मारायला सुरुवात केली. अचानक झालेल्या हल्ल्याने विदूषक थोडा गोंधळला. वेताळांचे ठोसे चुकवीत त्याने त्या वेताळावर आपल्या तलवारीने हल्ला केला व त्यांना पळवून लावले. नंतर विदूषकाने तिन्ही चोरांची नाके कापून एका फडक्यात बांधून घेतली. तो परत येण्यास निघाला तोच एका झाडाखाली एका प्रेताच्या उरावर बसलेला एक मांत्रिक त्याच्या नजरेस पडला. तो तोंडाने काहीतरी पुटपुटत होता. तो काय करीत आहे ते पहावे म्हणून विदूषक त्याच्यामागे दडून बसला.

तेवढ्यात त्या प्रेताच्या तोंडातून अग्निज्वाळा व बेंबीतून मोहऱ्या बाहेर पडल्या. मांत्रिकाने त्या मोहऱ्या गोळा केल्या. नंतर त्याने त्या प्रेताला

एक थप्पड मारली. तेव्हा तो मृत देह चटकन उठून उभा राहिला. मग मांत्रिक त्याच्या खांद्यावर बसून थोड्या अंतरावर असलेल्या एका देवळाकडे जऊ लागला. विदूषक गुप्तपणे त्याच्या मागोमाग जात होताच. देवळाजवळ जाताच मांत्रिक मृत देहाच्या खांद्यावरून खाली उतरताच मृत देह खाली कोसळला. ते देऊळ कात्यायनी देवीचे होते. मांत्रिकाने गाभाऱ्यात शिरून देवीची पूजा केली. नंतर तो देवीची प्रार्थना करू लागला, "हे देवी, तू मला हवा असलेला वर अजूनही दिला नाहीस. आता माझ्या देहाचा बळी घेऊन प्रसन्न हो!"

एवढ्यात त्या देव्हाऱ्यात देवीची वाणी घुमली, "वत्सा, आदित्यसेन राजाच्या मुलीला आज तू माझ्यापुढे बळी दिलंस तर तुझ्या मनातील इच्छा मी पूर्ण करीन." अशी ती देवीची वाणी ऐकताच मांत्रिक चटकन गाभाऱ्याबाहेर आला. देवळाबाहेर पडलेल्या मृत देहाला पुन्हा त्याने एक थप्पड मारली, तेव्हा तो मृत देह उठून उभा राहिला. नंतर त्याच्या खांद्यावर बसून त्या मांत्रिकाने राजकन्येला आणण्यासाठी आकाशात गमन केले. तो सर्व भयंकर प्रकार पाहून थक्क झालेला विदूषक स्वतःशी म्हणाला, "मी जिवंत असताना राजकन्येची हत्त्या करण्याची त्या दुष्टाची काय छाती आहे ? तो राजकन्येला येथे घेऊन येईपर्यंत मी येथेच थांबतो. मला राजकन्येचा प्राण वाचवलाच पाहिजे!" असे म्हणून विदूषक गाभाऱ्यातच लपून बसला.

तिकडे तो दुष्ट मांत्रिक खिडकीतून राजकन्येच्या महालात शिरला. झोपलेल्या राजकन्येला त्याने अलगद उचलले. आणि तिच्यासह मृत देहाच्या खांद्यावर बसून तो झपाट्याने मंदिराकडे निघाला. तेव्हा राजकन्या जागी झाली. आणि, "आई, बाबा, धावा! धावा!" असा आक्रोश करू लागली. पण तिच्या आक्रोशाकडे लक्ष न देता तो दुष्ट पाषाणहृदयी मांत्रिक तिला घेऊन थेट देवीच्या देवळाच्या गाभाऱ्यात शिरला. आता देवीसमोर तिचा बळी देण्यास तो सज्ज होत आहे, तोच हातात दिव्य तलवार घेतलेला विदूषक झटकन् पुढे आला व त्या मांत्रिकाला म्हणाला, "अरे दुष्टा, खरोखर तू राक्षस आहेस. माणूस नाहीस! या सुकुमार राजकन्येचा देवीपुढे बळी देण्याच्या कृत्याबद्दल ही घे शिक्षा!" असे म्हणून विदूषकाने त्या मांत्रिकाच्या जटा पकडल्या आणि आपल्या हातातील तलवारीच्या एकाच प्रहाराने त्याने त्याचा शिरच्छेद केला. देवीने राजकन्येऐवजी मांत्रिकाचाच बळी घेतला.

उघड्या डोळ्यासमोर घडलेला तो भयंकर प्रसंग पाहून राजकन्या भीतीने अगदी गारठून गेली होती. तेव्हा विदूषकाने तिला धीर दिला. आपला रक्षणकर्ता आपल्या वडिलांचा पुरोहित विदूषकच आहे हे तिला समजले तेव्हा तिला हायसे वाटले. तिने आपले प्राण वाचवल्याबद्दल विदूषकाचे आभार मानले. आता राजकन्येला राजवाड्यात कसे परत घेऊन जावे ही काळजी विदूषकाला पडली, तेवढ्यात आकाशवाणी झाली, ''हे शूरवीरा, तू ठार मारलेल्या मांत्रिकाला एक वेताळ वश झाला होता. त्या दुष्टाला राजकन्येशी लग्न करून पृथ्वीपती व्हायचे होते. पण त्याच्या दुर्दैवाने त्याला चकविले. आता तू त्याच्या वस्त्रातील मोहऱ्या घे. त्यांच्या अद्भुत सामर्थ्याने फक्त आजची रात्र तुला आकाशातून गमन करता येईल.''

अशी आकाशवाणी ऐकून विदूषक आनंदित झाला. त्याने मांत्रिकाच्या वस्त्रातील मोहऱ्या काढून घेतल्या व राजकन्येला घेऊन तो मंदिराबाहेर आला. तेव्हा पुन्हा आकाशवाणी झाली. ''हे वीरा, या महिन्याचे शेवटी तू पुन्हा या देवीच्या मंदिरात ये, तुझे कल्याण होईल. येण्यास विसरू नकोस.'' नंतर वेताळाच्या मदतीने आकाशात गमन करीत विदूषकाने राजकन्येला तिच्या महालात आणून पोचविले व तो जाऊ लागला.

तेव्हा नुकत्याच घडलेल्या भयंकर प्रसंगाने आणि मांत्रिक व वेताळ यांच्या भीतीने धास्तावलेली राजकन्या त्याला म्हणाली, ''हे वीरा, तू येथून गेलास तर मी जिवंत राहू शकणार नाही म्हणून पहाटे तू येथून जा.'' अशी राजकन्येची विनंती मान्य न करणे विदूषकाला बरे वाटेना. तेव्हा तिच्या रक्षणाकरिता तो तिथेच राहिला. विदूषक श्रम व जागरण यामुळे खूप थकून गेला होता. गालिच्यावर अंग टाकताच त्याला गाढ झोप लागली. मंचकावर पडलेली राजकन्या मनात भीती जागवीत रात्रभर जागीच राहिली. पहाट झाली तरी विदूषकाला जाग आली नाही, आणि आपल्या प्राणदात्याची झोपमोड करणे राजकन्येला प्रशस्त वाटले नाही.

सकाळ झाल्यावर राजकन्येच्या महालात आलेल्या एका दासीने गालिच्यावर झोपी गेलेल्या विदूषकाला पाहिले आणि ती वार्ता राजाला कळवली. तेव्हा, खरा प्रकार काय आहे, तो पाहण्यासाठी राजाने विदूषकाला जागे करून आपल्या महालात बोलावून घेतले. विदूषकाने सर्वदेखत घडलेली

सर्व हकीकत राजाला सांगितली. व आपल्याजवळ असलेली चोरांची कापलेली नाके व मांत्रिकाच्या वस्त्रातून घेतलेल्या मोहऱ्या सर्वांना दाखवल्या. तेव्हा विदूषकाच्या सांगण्यावर सर्वांचा विश्वास बसला. राजकन्येच्या प्राण वाचवल्याबद्दल सगळ्यांनी विदूषकाला धन्यवाद दिले. विदूषकाने सांगितलेल्या सर्व घटनांच्या खरेपणाची खात्री राजाने करून घेतली.

नंतर संतुष्ट होऊन राजाने जिचे विदूषकाने प्राण वाचविले ती आपली प्रिय कन्या रत्नप्रभा उपकारी व सच्छील विदूषकाला अर्पण केली. उदार पुरुष संतुष्ट झाला असता, त्याच्यावर उपकार करणाऱ्यास न देण्यासारखे असे त्याला काय असणार ? विदूषकाने मोठ्या थाटामाटाने राजकन्येचे पाणिग्रहण केले. अशा रीतीने स्वपराक्रमाने राजाचा पुरोहित असलेला शूर व धाडसी विदूषक त्याचा जामात झाला व आपल्या भार्येसह राजवैभवात मोठ्या सुखाने राहिला.

अशा तऱ्हेने मजेत रहात असता एक महिना संपत आला. आकाशवाणीने सांगितल्याप्रमाणे पुन्हा मंदिराकडे जाण्याचे विदूषक विसरून गेला होता. पण राजकन्येने त्याची त्याला आठवण करून दिली. ती म्हणाली, "स्वामिन, त्या दिवशी देवळातून आपण बाहेर पडलो, त्यावेळी महिनाअखेर पुन्हा तिथे येण्याविषयी देवीने सांगितले होते. ते आपल्या स्मरणात नाही काय ?" तेव्हा विदूषक म्हणाला, "प्रिये, बरं झालं तू त्याची आठवण केलीस ती. मला मुळीच आठवण नव्हती." नंतर त्या दिवशी विदूषकाने आपल्या प्रियेचा निरोप घेतला आणि नेहमीप्रमाणे, स्मरण करताच हाती आलेले दिव्य खड्ग घेऊन तो कात्यायनीच्या देवळात गेला. आत जाताच तो म्हणाला, "आकाशवाणीच्या सांगण्याप्रमाणे मी विदूषक पुन्हा इथे आलो आहे." तेव्हा "आत यावे" असे कोणी म्हटल्याचे त्याने ऐकले. तेव्हा तो धीटपणाने गाभाऱ्याकडे गेला आणि आश्चर्याने थक्क होऊन जागीच उभा राहिला.

त्याने पाहिले, समोर एक सुंदर महाल होता. त्या महालाच्या मध्यभागी आपल्या अंगकांतीने अंधाराला प्रकाशित करणारी एक दिव्य कुमारी एका आसनावर बसली होती. विदूषक गोंधळून तिच्याकडे एकटक पहातच राहिला. ती कुमारी कोण ? कोणाची ? इथे का आली ? असे प्रश्न विदूषकाच्या मनात आले. तेवढ्यात त्या कुमारीने स्मित करीत आपल्यासमोर असलेल्या

आसनाकडे बोट केले. तेव्हा विदूषक पुढे जाऊन त्या आसनावर बसला. तेव्हा ती कुमारी त्याला मोठ्या स्नेहाने म्हणाली, "महाराज, मी सांगितल्या प्रमाणे आपण येथे आलात त्याबद्दल प्रथम स्वागत करून मी आपले आभार मानते. मला पाहाताच आपल्या मनात जे जे प्रश्न निर्माण झाले त्याची उत्तरे अशी :

"मी भद्रा नावाची एक महाकुलीन विद्याधरी आहे. त्या दिवशी मी या बाजूस संचार करीत असताना आपला पराक्रम माझ्या नजरेस पडला. त्या आपल्या पराक्रमाने मला मोहित करून टाकले. एक महिन्याने पुन्हा येथे येण्याबद्दल मीच आकाशवाणी करून विनंती केली होती. आज दिवसभर मी आपली प्रतीक्षा केली पण आपण न आल्यानं संध्याकाळी मी माझ्या विद्याप्रयोगाने राजकन्येला भुरळ घातली. म्हणूनच तिने सांगितल्याप्रमाणे आपले येथे आगमन झाले." एवढे बोलून ती विद्याधरी पुढे म्हणाली, "आपण माझे पाणिग्रहण करावे म्हणूनच मी आपणास इथं आमंत्रित केलं आहे."

असे त्या भद्राविद्याधरीचे प्रिय शब्द ऐकून तिच्या सौंदर्याने व प्रेमाने मोहित झालेल्या विदूषकाने तिच्याशी गांधर्व विधीने विवाह केला. आणि तिच्यासह तो अनेक दिव्य सुखांचा आस्वाद घेत तिथेच राहिला. त्याला रत्नप्रभेची थोडीसुद्धा आठवण झाली नाही.

इकडे रत्नप्रभा आपल्या पतीची वाट पाहात पाहात झोपी गेली. पण सकाळी बराच वेळ झाला तरीही विदूषक परत आला नाही तेव्हा मात्र तिचा धीर खचला. धावत परत जाऊन तिने ती गोष्ट आपल्या मात्यापित्यांना सांगितली. आणि महिनाअखेर मंदिराकडे जाण्याची आपण आपल्या पतीला उगीचच आठवण करून दिली याबद्दल ती स्वतःलाच दूषणे देऊ लागली, आदित्यसेन राजा स्वतः विदूषकाच्या शोधार्थ देवी कात्यायनीच्या मंदिरात गेला. पण विद्याधरीने आपल्या विद्यासामर्थ्याने विदूषकासहित आपले सर्व ऐश्वर्य गुप्त करून टाकले होते. त्यामुळे राजाला तेथे देवीच्या मूर्तीखेरीज दुसरे कोणीही दिसले नाही. तेव्हा तो निराश होऊन नगराकडे परतला.

ते वृत्त ऐकून राजकन्या देहत्याग करण्यास सज्ज झाली, तेवढ्यात एक ज्ञानी तेथे आला व तिला म्हणाला, "मुली, तू आपलया पतीविषयी काही काळजी करू नकोस. तो जिवंत आहे मोठ्या सुखात आहे. लवकरच तो परत येऊन पुन्हा तुला भेटेल." असे त्या ज्ञानी पुरुषाचे शब्द ऐकून रत्नप्रभेच्या

हृदयात उत्पन्न झालेल्या पतीभेटीच्या आशेने तिने आपला निश्चय बदलला आणि आपला पती आपणास लवकरच भेटावा, म्हणून ती देवीची अन्यन्यभावे आराधना करू लागली.

तिकडे विदूषक भद्रा विद्याधरीबरोबर मोठ्या आनंदात राहिला असता एके दिवशी योगेश्वरी नावाची भद्रेची मैत्रीण असलेली एक विद्याधरी तेथे आली व एकांतात भेटून तिला म्हणाली, ''अग भद्रे, तू एका मनुष्याशी लग्न केल्यामुळे सगळी विद्याधर मंडळी तुझ्यावर रागावली आहेत. तुला काहीतरी कडक शासन करण्याचा सर्वांनी निर्णय घेतला आहे. तेव्हा तू येथून ताबडतोब निघून जा.'' असे आपल्या मैत्रिणीचे शब्द ऐकून भद्रा घाबरून गेली. आता काय करावे हे तिला समजेना तेव्हा योगेश्वरी तिला म्हणाली, ''जेथे विद्याधर जाऊ शकत नाहीत, असे एक स्थळ मी आता तुला सांगते. त्याचा मार्ग कसा आहे ते चांगलं लक्षात ठेव.'' एवढे बोलून काही क्षण थांबून पुढे ती म्हणाली, ''पूर्व समुद्राच्या पलीकडे कर्काटक नावाचे एक नगर आहे. त्याच्या पलीकडे शीतोदा नावाची नदी आहे. ती पार करायची. पुढे सिद्धांचे वसतिस्थान असलेला उदय नावाचा पर्वत आहे. तिथे तू जा म्हणजेच तू सुरक्षित राहशील. तू आपल्या मानवी प्रियपतीची काही काळजी करू नकोस. कोठे जायचं ते तू त्याला सांगून जा. तो शूरवीर नानाप्रकारच्या संकटांवर मात करून अखेर तुला तेथे येऊन भेटेल.'' असे सांगून योगेश्वरी निघून गेली.

आता विदूषकाचा व आपला वियोग होणार म्हणून भद्रेला वाईट वाटू लागले पण त्याला काही उपाय नव्हता. तिने विदूषकाला उदय पर्वताकडे जाण्याचा मार्ग सांगितला आणि आपल्या प्रेमाची खूण म्हणून आपल्या बोटातील अंगठी त्याला दिली. नंतर भल्या पहाटे भद्रा आपल्या सर्व दिव्य वैभवासह गुप्तपणे निघून गेली. सकाळी विदूषक जागा झाला. तेव्हा आपण स्मशानातील एका निर्जन अशा कात्यायनीच्या मंदिराच्या गाभाऱ्यात एकटेच आहोत असे त्याला आढळून आले.

एकाएकी भद्रा निघून गेली म्हणून विदूषकाला वाईट वाटले. यापूर्वी जे घडले ते स्वप्नासारखेच का असेही त्याला वाटले. पण बोटातल्या अंगठीकडे त्याचे लक्ष जाताच जे घडले ते खरेच आहे, मलाही आता तेथे जाण्याचा निश्चय केला पाहिजे. आपल्या शोधार्थ राजसेवक चहूकडे तपास करीत असणार तेव्हा वेषांतर करून या नगराच्या परिसरातून बाहेर पडावे असे त्याने ठरविले.

वेषांतरासाठी वेड्याचे सोंग घेणे चांगले असे त्याला वाटले. म्हणून त्या शहाण्याने वेड्याचे सोंग घेतले. अंगावर धूळ माखून घेतली. केस पिंजारले आणि चिंध्या पांघरून "भद्रे, भद्रे, तू कोठे आहेस ? असे म्हणत तो तेथून निघाला. विदूषकाने जरी वेड्याचे सोंग घेतले होते, तरी त्याच्या मुद्रेवरून काही लोकांनी त्याला ओळखले. ते ओरडले. "अरे, अरे, हा तर विदूषक!" मग काय ! लगेच तेथे लोकांची गर्दी झाली. त्यांनी विदूषकाला धरून राजवाड्यात नेले. आपला जावई सापडला म्हणून राजाराणीला आनंद झाला. रत्नप्रभा तर आनंदाने नाचू लागली. पण त्यांचा आनंद क्षणभरच टिकला. कोणी काही विचारले तर विदूषक 'भद्रे, भद्रे' एवढे दोन शब्दच बोले. राजवैद्याने सांगितल्याप्रमाणे त्याला अभ्यंगस्नान घातले गेले. पण त्या सोंगाड्याने पुन्हा आपले सर्व अंग धुळीने माखून घेतले. त्याला नेसवलेली भरजरी वस्त्रे त्याने फाडून टाकली. समोर आणलेले पंचपक्वान्नांचे ताट पायाने उडवून दिले. अशा परिस्थितीत विदूषकाला डांबून ठेवणे योग्य नाही त्याने कदाचित जीव दिला तर आपल्याला ब्रह्महत्येचे पातक लागेल. तेव्हा त्याला वाटेल तेथे जाण्याचे व हवे ते करण्याचे स्वातंत्र्य द्यावे. कदाचित काही दिवसांनी तो ताळ्यावर येईल, असे राजाला वाटले. आणि त्याने वेड्याचे सोंग पांघरलेल्या विदूषकाला त्याच्या इच्छेप्रमाणे वागण्यास परवानगी दिली:

नंतर एके दिवशी विदूषक नगरातून बाहेर पडला आणि पूर्व समुद्राच्या दिशेने चालू लागला. काही दिवसांनी तो संध्याकाळच्या वेळी पौंडवर्धन नावाच्या एका नगरात येऊन पोहोचला. तेथे तो एका घराच्या दाराशी गेला. ते घर एका म्हाताऱ्या ब्राह्मणाच्या स्त्रीचे होते. विदूषक वृद्ध स्त्रीला म्हणाला, "आजी आजची एक रात्र मला तुमच्या घरी आश्रय देता का ?" "हो देईन की!" असे म्हणून तिने प्रथम विदूषकाचे आदरातिथ्य केले. नंतर ती त्यास म्हणाली, "आज तू सुदैवाने येथे आला आहेस. हे घर मी आता तुलाच देणार आहे. तू येथे मोठ्या आनंदाने राहा." असे त्या आजीचे बोलणे ऐकून आश्चर्यचकित झालेल्या विदूषकाने तिला विचारले, "आजी, तुम्ही असं का बोलला ?" "बाबारे, तशीच परिस्थिती आज आली आहे. त्याचं कारण ऐक. या नगराचा राजा देवसेन आहे. मोठ्या नवसाने त्याला एक मुलगी झाली. तिचे नांव दुःखलब्धिका. ती उपवर झाली तेव्हा कच्छप देशाच्या राजाशी तिचा विवाह झाला. पण लग्नाच्या दिवशी रात्री तो अंतःपुरात जाताच नाहीसा झाला.

मग राजाने दुसऱ्या राजपुत्राशी राजकन्येचा विवाह करून दिला. पण तोही राजपुत्र विवाहाच्या रात्रीच नाहीसा झाला. तेव्हा राजाने चिडून दररोज नगरातील एका पुरुषाशी राजकन्येचा विवाह लावण्याचे ठरविले." एवढे बोलून क्षणभर थांबून ती वृद्ध स्त्री पुढे म्हणाली, "राजा म्हणाला पाहू किती पुरुष मरतात ते. या संकटातून जो जिवंत राहील तोच तिचा पती होईल. दैवगतीपुढे कोणाचं काय चालणार! तेव्हा राजाज्ञेप्रमाणे रोज एका घरातून एका पुरुषाला नेऊन त्याचा राजकन्येशी विवाह लावतात. आजपर्यंत पुष्कळ नेले गेले. पण कोणीही जिवंत परत आलेला नाही. आज माझ्या एकुलत्या एक मुलाची पाळी आहे. त्याला रात्री नेण्यात आले की उद्या सकाळी मी अग्नीत प्रवेश करण्याचा निश्चय केलाय. म्हणूनच मी जिवंत असताना तुझ्यासारख्या गुणवंतालाच घरदार सर्व काही देऊन टाकते. म्हणजे पुढील जन्मी तरी असं भयंकर दुःख मला भोगावं लागणार नाही." असे त्या दुःखी स्त्रीचे बोलणे ऐकून तिला धीर देत विदूषक म्हणाला, "आजी, तुम्ही मुळीच काळजी करू नका. मीच तुमच्या मुलाऐवजी राजकन्येशी लग्न करण्यास जातो. तुम्ही नको म्हणू नका. कारण माझ्याजवळ अशी एक सिद्धी आहे की, तिच्यामुळे मला काहीही अपाय होणार नाही. तुम्ही अगदी निष्काळजी राहा."

तेवढ्यात आजीच्या मुलाला घेऊन जाण्यासाठी राजाचा सेवक आला. त्याच्याबरोबर शूर विदूषक राजवाड्यात गेला. राजाने त्याचे राजकन्येशी लग्न लावले. रात्री विदूषक तिच्यासह अंतःपुरात गेला. मंचकावर पडताच राजकन्येला गाढ झोप लागली. असे पाहून विदूषक, स्मरण करताच जवळ आलेले दिव्य खड्ग हाती धारण करून जागत बसला. मध्यरात्र झाली. सर्वत्र शांतता पसरली तेव्हा एकाएकी अंतःपुराचा दरवाजा उघडला गेला आणि तिथे एक भयंकर राक्षस विदूषकाला दिसला. त्या राक्षसाने महालाच्या दारातच उभे राहून अपला यमदंडासारखा अजस्त्र हात लांबच लांब केला. पुढे पुढे येणारा तो भयंकर हात पहाताच विदूषक चटकन् पुढे झाला. आणि त्याने आपल्या खड्गाने तो हात काडकन तोडून टाकला. तेव्हा आत कोणीतरी आपल्यापेक्षा मोठा बलिष्ठ आहे असे समजून राक्षस पळून गेला. तेवढ्यात राजकन्या जागी झाली. तोडून टाकलेला तो राक्षसाचा भला मोठा हात पाहून प्रथम ती भयभीत नंतर आश्चर्यचकित झाली. आणि लगेच आनंदितही झाली.

सकाळी राजानेही तो हात पाहिला आणि विदूषकाकडून मोठ्या

आनंदाने सर्व हकीकत ऐकून घेतली. तेव्हा असा पराक्रमी व साहसी जावई प्राप्त झाला म्हणून त्याला धन्यता वाटली. नंतर काही दिवस आनंदी विदूषकाने राजकन्येच्या सहवासात घालविले. आणि एके दिवशी रात्री गाढ झोपी गेलेल्या राजकन्येला तेथेच सोडून विदषक भद्रेच्या शोधार्थ मुकाट्याने नगराबाहेर पडला. पुन्हा त्याचा प्रवास पुढे सुरू झाला.

काही दिवसांनी विदूषक प्रवास करीत पूर्व समुद्राच्या किनाऱ्यावर असलेल्या ताम्रलिप्तिकी नावाच्या नगरात आला. तेथे स्कंददास नावाचा एक व्यापारी त्याला भेटला. विदूषकाने त्याच्याशी मैत्री केली. मालाने भरलेले स्कंददासाचे जहाज समुद्राच्या पैलतीराकडे जाणार होते. त्या जहाजात विदूषकाने जागा मिळविली. तो स्कंददासाबरोबर निघाला. ते जहाज प्रथम सपाट्याने पुढे गेले. पण भर समुद्रात गेल्यावर मात्र ते एकाएकी कोठेतरी अडकून बसले. ते पुढेही जाईना आणि मागही येईना. आहे तिथेच मख्खपणे थांबून राहिले. तेव्हा कष्टी झालेला स्कंददास मोठ्या निर्धाराने म्हणाला, ''या ठिकाणाहून माझ्या जहाजाची जो सुटका करील त्याला मी माझी अर्धी संपत्ती व माझी सुंदर कन्या देईन.'' ''ठीक आहे,'' विदूषक म्हणाला, ''मी समुद्रात उतरतो आणि जहाजाची सुटका करतो. तुम्ही माझ्या कंबरेला दंडाला दोर बांधा. जहाजाची सुटका झाली की, तो दोर ओढून मला वर घ्या.''

याप्रमाणे स्कंददासाला सांगून विदूषकाने नेहमीप्रमाणे आपल्या हाती खड्ग धारण केले. खलाशांनी त्याच्या कंबरेला व दंडाला दोर बांधताच त्याने अथांग समुद्रात उडी घेतली. खोल बुडी मारून तो पाहू लागला. तेव्हा त्याला एक भल्यामोठ्या शरीराचा एक धिप्पाड पुरुष आडवा झोपलेला दिसला. त्याच्या पायात ते जहाज अडकून बसले आहे, असे पाहून विदूषकाने त्वरेने आपल्या खड्गाने त्या धिप्पाड माणसाचा पाय तोडून टाकला. मुलगी व निम्मी संपत्ती द्यावी लागेल म्हणून स्वार्थी व धनलोभी व्यापाऱ्याने विदूषकाला बांधलेला दोर चटकन कापून टाकला. आणि जहाजाला जोराने पुढे गती दिली.

अकस्मात दोर तुटल्यामुळे विदूषक निराधार झाला. त्या भयंकर समुद्रात आता आपले कसे होणार या विचाराने प्रथम तो थोडा गांगरला. पण क्षणभरच. तेवढ्यात त्याची दृष्टी जवळच पाण्यावर तरंगत असलेल्या त्या धिप्पाड पुरुषाच्या तुटलेल्या पायाकडे गेली. चटकन त्याने त्याचा आधार

घेतला. आणि झपाट्याने पोहत पोहत अखेर समुद्राचा पैलकिनारा गाठला. त्याचवेळी आकाशवाणी झाली, "धन्य विदूषका! धन्य तुझी! तुझ्या अतुल शौर्यावर व साहसावर, मी अग्निदेव पुन्हा प्रसन्न झालो आहे. असाच धैर्यानं पुढे जा. तुझं इच्छिलेलं कार्य सिद्धीस जाईल. येथून कर्काटक नगर सात दिवसांच्या अंतरावर आहे. त्या सात दिवसात माझ्या प्रसादाने तुला तहान व भूक यांची पीडा होणार नाही."

असे अग्निदेवाचे धीर गंभीर शब्द ऐकून विदूषकाला फार हर्ष झाला. अग्निदेवाला मनोभावे नमस्कार करून त्याने आपला पुढील प्रवास सुरू केला. बरोबर सात दिवसांनी विदूषकाने कर्कोटक शहरात प्रवेश केला. तेथे एका भल्या मोठ्या मठात त्याने मुक्काम केला. संध्याकाळी त्याच्या कानावर दवंडी पिटल्याचा आवाज पडला. तेव्हा तो चटकन मठाबाहेर पडला. राजसेवक दवंडी पिटत होते. "ऐका हो ऐका, जो कोणी ब्राह्मण किंवा क्षत्रिय राजकन्येच्या महालात राहण्याचे धाडस करील, त्याच्या हातात राजा आपल्या कन्येचा हात देणार आहे हो!" आपल्या साहसाला हे आणखी एक आव्हान आहे, असे विदूषकाला वाटून त्याला फार आनंद झाला. दवंडीप्रमाणे आपण राजकन्येच्या महालात राहण्याचे धाडस करणार आहोत असे त्याने मठातील काही लोकांना सांगितले. तेव्हा ते म्हणाले, "भल्या माणसा, असे वेड्यासारखे साहस करू नकास. फुकट आपला प्राण गमावून बसशील. राजकन्येशी लग्न म्हणजे साक्षात मृत्यूशीच लग्न आहे. आजपर्यंत तुझ्यासारखे पुष्कळ धाडसी वीर तेथे गेले. पण एकही जिवंत परत आला नाही." पण विदूषकाने केलेल्या निश्चयापासून त्यला कोणीही परावृत्त करू शकले नाही.

नंतर विदूषक त्वरेने राजवाड्यात गेला. तिथे राजा आर्यवर्म्याने त्याचे स्वागत केले. रात्री भोजनानंतर विदूषकाला राजकन्येच्या महालाजवळ नेऊन सोडण्यात आले. धीटपणे त्याने महालात प्रवेश केला. तिथे खिन्न होऊन आसवे गाळीत बसलेल्या सुंदर राजकन्येकडे त्याचे लक्ष गेले. तेव्हा तो चटकन पुढे झाला आणि त्याने तिला खूप धीर देऊन तिचे सांत्वन केले. त्यावेळी विदूषकाला दु:खलब्धिकेची आठवण झाल्यास नवल ते काय ? राजकन्या झोपी गेल्यावर अग्नीचे स्मरण करून विदूषकाने दिव्य खड्ग हाती घेतले. आणि लवकरच येणाऱ्या अज्ञात अशा महासंकटाची वाट पहात तो जागत बसला.

मध्यरात्र होऊन चहूकडे शांतता पसरली. त्यावेळी एक भलामोठा राक्षस महालाचे दार उघडून सरळ आत आला. त्याचा उजवा हात तुटलेला होता. पौंड्रवर्धनात ज्याचा हात आपण तोडला तोच हा राक्षस आहे हे विदूषकाने ओळखले. तेव्हा तडक पुढे जाऊन त्याने त्या राक्षसाचे केस धरले आणि त्याचा शिरच्छेद करण्यासाठी आपले दिव्य खड्ग उगारले, त्याच क्षणी भीतीने गारठलेला तो राक्षस विदूषकाला दीनवाणीने म्हणाला, "हे वीर पुरुषा, कृपा करून मला मारू नकोस. माझं नाव यमदंष्ट्र आहे. येथील राजाची मुलगी आणि पौंड्रवर्धनाची राजकन्या या पूर्वजन्मीच्या माझ्या मुली आहेत. त्यांना पराक्रमी वीर पुरुष पती लाभावा म्हणून महादेवाच्या आज्ञेने मी आजपर्यंत हे अघोर कर्म करीत होतो. माझ्या कन्येचा भावी पती माझ्या कसोटीत उतरला तरच तो माझ्या हातून सुटतो नाहीतर त्याचा मी बळी घेतो. काही दिवसांपूर्वी पौंड्रवर्धनात एका वीर पुरुषाने माझा उजवा हात तोडून मला चांगलाच हात दाखवला आणि आज तू मला स्वपराक्रमाने जिंकले आहेस. माझ्या कसोटीला तू उतरला आहेस. यापुढे मी तुझा दास. तू मला आज्ञा करायची व मी ती पाळायची !"

असे त्या यमदंष्ट्र राक्षसाचे बोलणे ऐकून विदूषक हसून म्हणाला, "अरे, पौंड्रवर्धनात मीच तुझा उजवा हात तोडला होता." "अस्स !" यमदंष्ट्र आश्चर्याने म्हणाला, "मग तू खासच सामान्य माणूस नाहीस. तुझ्यात देवत्व असले पाहिजे. तू जेव्हा माझी आठवण करशील तेव्हा मी तुझ्या मदतीला धावून येईन." असे म्हणून यमदंष्ट्र अदृश्य झाला.

सकाळी राजकनया जागी झाली. तेव्हा तिला जिवंत असलेला विदूषक दिसला. तेव्हा आनंदित होऊन प्रथम तिने त्याचे अभिनंदन केले. राजा आर्यवर्म्याला ती बातमी कळताच तो त्वरेने तेथे आला. रात्री घडलेली सर्व हकीकत विदूषकाने राजाला सांगितली. तेव्हा राजाला फार आनंद झाला. त्याने पराक्रमी विदूषकाचा भव्य सत्कार केला आणि मोठ्या थाटामाटात त्याचा आपल्या मुलीशी विवाह करून दिला. विवाहानंतर विदूषक काही दिवस मोठ्या आनंदात राजकन्येच्या सहवासात राहिला. एके दिवशी पुन्हा त्याला भद्रेची आठवण झाली. तेव्हा एका रात्री विदूषक कोणाला न कळत कर्कोटक नगरातून बाहेर पडला.

नगराबाहेर पडल्यावर विदूषकाने यमदंष्ट्र राक्षसाचे स्मरण केले. तयाच क्षणी तो विदूषकापुढे प्रगट झाला आणि म्हणाला, "बोला काय आज्ञा आहे ?" "मित्रा, मला उदय पर्वतावर घेऊन चल." विदूषक म्हणाला. "ठीक आहे. चला." असे म्हणून राक्षसाने विदूषकाला आपल्या खांद्यावर घेतले आणि मनुष्यास ओलांडून जाण्यास महाकठीण अशा शीतोदा नदीपार होऊन त्याने विदूषकाला उदय पर्वताच्या पायथ्याशी दाखल केले. नंतर तो म्हणाला, "वीर मित्रा, हाच तो उदय पर्वत. तिथं सिद्ध राहतात. म्हणून मला तिथं जाता येत नाही. मी आता जातो." असं म्हणून यमदंष्ट्र अदृश्य झाला.

आता विदूषक एकटाच पुढे निघाला. काही अंतर चालून जाताच त्याला रम्य सुंदर असे एक सरोवर दिसले. त्या सरोवरात खूप सुंदर कमळे फुललेली होती. त्या सरोवराच्या काठावर बसून आता पुढे काय करावे असा तो विचार करू लागला. तोच तेथे चार सुंदर सित्रया पाणी नेण्याकरिता आल्या. आपल्या घागरी पाण्याने भरून घेऊन त्या तेथून निघून जाणार, तेवढ्यात विदूषक धीटपणे पुढे गेला; आणि मोठ्या नम्रतेने त्यांना म्हणाला, "तुम्ही हे पाणी कोणाकरिता नेत आहात ?" तेव्हा त्यांच्यापैकी एकजण म्हणाली, "या पर्वतावर भद्रा नावाची एक दिव्य विद्याधरी राहात आहे. तिच्या स्नानासाठी आम्ही हे पाणी नेत आहोत." ·

असे त्या स्त्रीचे शब्द ऐकून, आपण येथे आलो आहोत हे भद्रेला कसे कळवावे असा विचार विदूषकाच्या मनात आला. तेवढ्यात त्या चौघींपैकी एकजण विदूषकाला म्हणाली, "महाराज, ही घागर उचलायला जरा मदत करता का ?" ही सुवर्णसंधी चतुर विदूषकाने बरोबर साधली. घागर उचलताना भद्रेने आठवण म्हणून दिलेली अंगठी त्याने त्या घागरीत गुपचूपपणे टाकली. नंतर त्या स्त्रिया निघून गेल्या आणि विदूषक कमलपुष्पांच्या सौंदर्याकडे बघत राहिला.

तिकडे पाणी घेऊन गेलेल्या स्त्रिया भद्रेला स्नान घालू लागल्या. तेव्हा एका घागरीतील अंगठी भद्रेच्या मांडीवर पडली. ती पाहाताच आश्चर्यचकित झालेल्या भद्रेने, आपल्या पतीला खूण म्हणून दिलेली अंगठी ती हीच, असे ओळखले. तिने दासींना विचारले, "या पर्वतावर तुम्हाला कोणी देखणा व बाणेदार पुरुष दिसला का ?" तेव्हा एक दासी म्हणाली, "होय. एक तरुण

देखणा मनुष्य सरोवरा काठी बसलेला होता. त्यानेच मला भरलेली घागर उचलण्यास मदत केली.''

तो तरुण कोण आहे, हे आता भद्रेला स्पष्टपणे कळले. मोठ्या आनंदाने ती दासींना म्हणाली, ''जा, जा, लवकर जा. अणि त्या महाभागाला येथे घेऊन या. तो माझा पती आहे!'' विदूषक तेथे येताच भद्रेने मोठ्या आनंदाने त्याचे स्वागत केले. नंतर विदूषकाने उज्जयिनीहून निघाल्यापासूनची सर्व हकीकत भद्रेला सांगितली. आपली भेट व्हावी म्हणून विदूषकाने किती यातायात सहन केली, किती प्राणघातक संकटांवर मात करून त्याला इथे यावे लागले हे सर्व ऐकल्यावर विदूषकाच्या आपल्यावरील निस्सीम प्रेमाची भद्रेला प्रचीती आली. मोठ्या प्रेमाने ती विदूषकाला म्हणाली, ''प्राणनाथ, तुम्ही माझ्याकरिता आपले प्राण तुच्छ मानलेत. आपल्या त्या अपार प्रेमाने मला अपली दासी बनविले आहे. यापुढे तुम्ही माझे व मी तुमची. आता विद्याधरांचे वैभव मला नको. तुम्ही जिथे राहाल तिथे मी राहीन.'' असे भद्रेचे बोलणे ऐकून विदूषकाला अवर्णनीय आनंद झाला.

विदूषक भद्रेला म्हणाला, ''प्रिये, तू माझ्याकरिता करीत असलेला त्याग अनमोल आहे.आता यापुढे उज्जयिनीतच राहावं अस मला वाटतं. तेव्हा आता आपण तिकडे जायला निघू.'' दुसऱ्या दिवशी सकाळी भद्रेने आपल्या सर्व दिव्य विद्यांचा त्याग केला. त्याबरोबर ती एक साधारण स्त्री झाली. नंतर विदूषकाने यमदंष्ट्र राक्षसाचे स्मरण करताच तो प्रगट झाला. त्याच्या खांद्यावर बसून भद्रेसह विदूषक प्रथम कर्कोटक नगरात गेला. तिथे गेल्यावर त्याने आपल्या पत्नीला बरोबर घेतले. नंतर दोन्ही बायकांसह तो राक्षसाच्या खांद्यावर बसून पूर्व समुद्राच्या किनाऱ्यावर आला.

तिथे विदूषकाला विश्वासघातकी स्कंददास व्यापाऱ्याची आठवण झाली. तेव्हा तो त्याच्याकडे गेला. विदूषकाला पाहाताच स्कंददासाची घाबरगुंडी उडाली. पूर्वीच्या ठरावाप्रमाणे त्याने आपली मुलगी विदूषकाला मुकाट्याने दिली. विदूषकाने तिचा स्वीकार केला आणि त्याला शासन म्हणून त्याची सर्व संपत्ती हिरावून घेतली. नंतर विदूषक आपल्या तीन भार्यांसह पौंड्रवर्धनास गेला. राक्षसाच्या खांद्यावर बसून आलेल्या विदूषकाला पाहून लोकांची तारांबळ उडाली. तेव्हा विदूषकाने सर्व लोकांना धीर दिला. आणि तो राजवाड्यात गेला. तेथे देवसेन राजाने दुःखलब्धिकेला त्याच्या स्वाधीन केले.

नंतर विदूषक आपल्या चारीही भार्यांसह राक्षसाच्या खांद्यावर बसून उज्जयिनी नगराजवळ उतरला. ही हकीकत आदित्यसेन राजाला कळताच राजा स्वतः विदूषकाचे स्वागत करण्यास सामोरा आला. विदूषक व त्याच्या चार भार्या खाली उतरल्यावर राक्षस गुप्त झाला. खूप वर्षांनी आपल्या पराक्रमी जावयाच्या दर्शनाने राजाला फार आनंद झाला. त्याने विदूषकाच्या सन्मानार्थ नगरात महोत्सव साजरा करण्याची आज्ञा दिली. राजवाड्यात गेल्यावर विदूषक प्रथम कितीतरी वर्षे डोळ्यात प्राण आणून आपली वाट पहाणाऱ्या रत्नप्रभेला भेटला. नंतर त्याने तिची व आपल्याबरोबर आलेल्या चार भार्यांची ओळख करून दिली. आदित्यसेन राजाने पराक्रमी विदूषकाला आपले निम्मे राज्य दिले. पुढे विदूषकाने मोठा पराक्रम करून सर्व पृथ्वी जिंकली आणि बहिणीप्रमाणे वागणाऱ्या आपल्या पाचीही भार्यांसह मोठ्या आनंदाने व सुखाने राज्य केले.

# अग्निदेवाचा प्रसाद

फार फार वर्षांपूर्वी पाटलीपुत्र नगरात विक्रमतुंग नावाचा राजा राज्य करीत होता. तो नावाप्रमाणेच मोठा पराक्रमी, बलशाली व धैर्यशाली होता. रणांगणावर तो आपल्या अतुल शौर्याने शत्रूला 'दे माय धरणी ठाय' करून सोडी. दानशूरपणाबद्दलची त्याची कीर्ती सर्वत्र पसरलेली होती. त्याच्याकडे आलेला कोणीही याचक कधीही विन्मुख जात नसे. विक्रमतुंगाला शिकारीचा फार नाद होता.

असाच एके दिवशी विक्रमतुंग आपल्या निवडक सैन्यासह शिकारीकरिता वनात गेला. नानाप्रकारच्या पशूंची लीलेने शिकार करीत त्याची घौडदौड चालू होती. त्यावेळी काही अंतरावर एका झाडाखाली एक ब्राह्मण बेलफळांचा होम करीत आहे, असे त्याला दिसले. पण शिकारीत दंग असल्यामुळे तसाच तो पुढे गेला. नंतर पुष्कळ वेळ शिकारक्रीडा केल्यावर दमलेला राजा नगराकडे परत निघाला तेव्हा तो ब्राह्मण अजूनही होम करीतच आहे, असे त्याच्या दृष्टीस पडले.

त्या गोष्टीचे राजाला नवल वाटून तो त्या ब्राह्मणाजवळ गेल. आणि त्याला वंदन करून राजाने विचारले, 'तुम्ही कोण ? कोणता हेतु मनात धरून, तुम्ही हा होम करीत आहात ?' तेव्हा तो ब्राह्मण म्हणाला, 'महाराज, माझं नाव नागशर्मा. आता या होमापासून मला काय फळ मिळणार ते ऐका. बेलफाळाच्या होमामुळे अग्निदेव जेव्हा प्रसन्न होतो तेव्हा तो सोन्याचं बेलफळ हाती घेऊन प्रगट होतो आणि इच्छित वर देतो. पण मी खरोखर फार दुर्भागी आहे! आज कित्येक दिवस मी बेलफळांचा होम करीत आहे पण अद्याप अग्निदेव माझ्यावर प्रसन्न होत नाही.'

असे त्या ब्राह्मणाचे निराशेचे शब्द ऐकून राजा त्याला म्हणाला, 'अस्सं ! तर मला एक बेलफळ द्या, मी आपल्या हातानं या होमात त्याचं हवन



करतो. आणि अग्निदेवाला या क्षणीच प्रसन्न करतो.' 'पण महाराज.,' ब्राह्मण म्हणाला, 'आपलं स्नान झालेलं नसणार. अशा अपवित्र अवस्थेत होमात दिलेल्या बेलफळाच्या आहुतीनं अग्निदेव कसा प्रसन्न होईल ? मी आज इतके दिवस व्रतस्थ व पवित्र राहून त्याची उपासना करीत असून सुद्धा तो माझ्यावर अजून प्रसन्न होत नाही.'

'तुम्ही एक बेलफळ माझ्या हातात द्या,' राजा शांतपणे म्हणाला, 'आणि काय चमत्कार घडतो तते समक्षच पाहा.'

तेव्हा त्या ब्राह्मणाने मोठ्या कुतूहलाने एक बेलफळ राजाच्या हातात दिले. ते घेऊन राजा होमकुंडासमोर उभा राहिला. आणि दृढनिश्चयी स्वरात म्हणाला, 'हे अग्निदेवा, तू जर या बेलफळाच्या आहुतीने संतुष्ट झाला नाहीस तर मी माझं मस्तक तुला अर्पण करीन !' असे म्हणून राजाने आपल्या हातातील बेलफळ होमकुंडात टाकले. तो काय आश्चर्य! त्या होमकुंडात साक्षात अग्निदेव हाती सोन्याचे बेलफळ घेऊन प्रगट झाला. आणि राजाला म्हणाला, 'राजन्, तुझ्या धैर्यानं मी संतुष्ट झालो आहे. तुला पाहिजे तो वर मागून घे.'

तेव्हा तो धैर्यशाली राजा म्हणाला, 'अग्निदेवा, माझ्यासाठी मला काहीच मागायचं नाही. आपण या ब्राह्मणाची इच्छा पूर्ण करा एवढीच प्रार्थना!''

अशी त्या निरिच्छ राजाची प्रार्थना ऐकून जास्तच प्रसन्न झालेला अग्निदेव म्हणाला, 'राजन्, हा ब्राह्मण मोठा धनवंत होईल. आणि माझ्या कृपेनं तुझीही संपत्ती अक्षय राहील.'

अग्नीचा असा कृपाप्रसाद ऐकून ब्राह्मणाने त्याला वंदन करून विचारले, 'भगवन्, हा राजा स्वेच्छाचारी असून सुद्धा तू प्रगट होऊन त्याला वर दिलास आणि मी आज कितीतरी दिवस पवित्र राहून तुझ्या दर्शनासाठी होम करीत आहे. तरी तू माझ्यावर का प्रसन्न झाला नाहीस ?'

तेव्हा अग्निदेव म्हणाला, 'ब्राह्मणा, मी जर प्रगट होऊन राजाला दर्शन दिलं नसतं तर या दृढनिश्चली राजानं खरंच आपलं मस्तक छेदून मला अर्पण केलं असतं. तीव्र सत्त्ववानाला लवकर सिद्धी लाभते. तुझ्या सारख्या मंद सत्ववानाला सिद्धी लाभण्यास विलंब लागतो,' असे म्हणून अग्नी अदृश्य झाला. पुढे राजा आपल्या नगराकडे परतला आणि त्याचा निरोप घेऊन गेलेला ब्राह्मण आपल्या घरी गेला. नंतर हळूहळू धन संपादन करीत तो अग्नीच्या कृपेने महाधनवंत झाला.

पुढे काही महिन्यांनी एके दिवशी राजा विक्रमतुंग आपल्या महालात बसला असता द्वारपाल तिथे येऊन त्याला म्हणाला, 'महाराज, राजद्वारी दत्तशर्मा नावाचा कोणी एक ब्राह्मणपुत्र एकांतात आपल्या भेटीची इच्छा करीत आहे.' तेव्हा त्यास घेऊन येण्याची राजाने द्वारपालाला आज्ञा केली. त्याप्रमाणे दत्तशर्मा तेथे आला आणि राजाला वंदन करून म्हणाला, 'महाराज, एका चूर्णाच्या साहाय्याने तांब्याचे तत्काल सोनं करण्याची किमया मी जाणतो. माझ्या गुरूनं ती मला सप्रयोग शिकविली आहे.' असे दत्तशर्माचे बोलणे ऐकून राजाने तांबे मागवून घेतले. ते वितळवून त्याचा रस केल्यावर त्यात दत्तशर्माने आपल्या जवळचे चूर्ण टाकले. पण ते रसात पडण्यापूर्वीच तिथे अदृश्यरूपाने असलेल्या एका यक्षाने वरच्यावर आपल्या हाती घेतले. त्यामुळे ताम्ररसाचे सोने झाले नाही.

तेव्हा आपले काही चुकले असावे असे वाटून बिचाऱ्या दत्तशर्माने तीनदा तसा प्रयोग केला. पण अदृश्य असलेल्या यक्षाने तो साध्य होऊ दिला नाही. तांब्याचे काही सोने झाले नाही. दत्तशर्मा गोंधळून गेला. अग्नीच्या कृपाप्रसादामुळे राजाला यक्षाचे ते गुप्त कृत्य दिसले होते. म्हणून त्याने ते चूर्ण स्वतःच्या हातात घेतले आणि तांब्याच्या रसात टाकले. त्यावेळी त्या चूर्णाला यक्षाने हात लावला नाही. त्यामुळे तांब्याचे सोने झाले. तो चमत्कार पाहून आश्चर्यचकित झालेल्या दत्तशर्माने राजाला विचारले, 'महाराज, मी ताम्ररसात तीनदा चूर्ण टाकलं पण त्या रसाचं सोनं झालं नाही. आणि आपण आपल्या हाताने एकदाच ते टाकल्यावर त्याचं सोनं झालं. त्याचं कारण काय ?' तेव्हा राजाने त्याला यक्षाची हकीकत सांगितली.

नंतर राजाने दत्तशर्माकडून चूर्ण तयार करण्याची कृती शिकून घेतली. त्याला आपल्या दरबारी मोठ्या मानाने ठेवून घेतले. पुढे त्या उदार राजाने दत्तशर्माचे मोठ्या थाटात लग्न करून दिले आणि त्याला खूप संपत्ती देऊन संतुष्ट केले. दत्तशर्माकडून आत्मसात केलेल्या किमयेने राजाने आपला सर्व खजिना सोन्याचा करून टाकला हे काय सांगायला पाहिजे !

म. सं. सं. कार्ये, बालमालय शाखा.
बाल वाङ्मय विभाग.
क्र. २९७५ . दिनांक ३१३१९८
विषय ०११०१ क्र. ..........

BVBK-0402975